# हिरव्या बोक्याची गोष्ट



डॉ. नितीन मोरे

# हिरव्या बोक्याची गोष्ट

(विज्ञानकथा संग्रह)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# हिरव्या बोक्याची गोष्ट

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# हिरव्या बोक्याची गोष्ट

लेखक: डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

मुखपृष्ठ : चैतन्य चव्हाण, ठाणे

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २४ सप्टेंबर २०२०

©esahity Pratishthan®2020

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत: आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे सव्विसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo. com

# हिरव्या बोक्याची गोष्ट

( विज्ञानकथा )

डॉ. नितीन मोरे

हिरव्या बोक्याची गोष्ट

## अनुक्रमणिका

१. हिरव्या बोक्याची गोष्ट

२. रॉबिनहूडची गोष्ट

३. कालयंत्र

४. बळी तो कान पिळी

५. स्वप्नांच्या पलिकडले..

६. आमच्या कालयंत्राची गोष्ट

७. ओळख

८. जमदग्नी डिव्हाइसची गोष्ट

९. करविता धनी

१०. व्हर्च्युअल रिॲलिटी!

११. अधांतरी!

अभिप्राय

डॉ नितिन मोरे यांचे हिरवा बोका नावाचा कथासंग्रह नुकताच वाचला. ते स्वत: एक फुफ्फुस रोग तज्ञ आहेत. त्यामुळे मानवी शरीर,  शरीर रचना, शरीराचे व्यापार यांची त्याना चांगली जाण आहे. लहानपणापासून त्यांच्या मनात जे विज्ञान घोळत होते त्याचे त्यानी विज्ञान कथेमध्ये रूपांतर केले आहे. त्यांच्या कथेचे बीज कोठेतरी बाहेरून सुचले असावे असे वाटत राहते. उदा काल यंत्राची कल्पना तशी जुनी आहे. त्यावर त्यानी दोन कथा लिहिल्या आहेत. भावना नियंत्रण बाहेरील उपकरणाद्वारे किंवा मेंदूमधील भाग बदलण्यासाठी मृत मेंदूमधील जीवित भाग वापरणे ही कथा नावीन्यपूर्ण वाटली. काही कथाबीजे मात्र तशीच सोडल्यासारखी वाटली. अधांतरी ही मृत्यूनंतर अस्तित्व आहे काय या कथेवर एक अप्रतिम पुस्तक होऊ शकेल. डॉ रेमॉन्ड मूडी या प्रख्यात मानस शास्त्रज्ञाने मृत्यूच्या उंबरठ्यावर जाऊन आलेल्या व्यक्तींच्या अनुभवावर पावणे दोनशे पानांचे जे पुस्तक लिहिले आहे ते एकदा वाचायला सुरवात केली म्हणजे एका बैठकीत वाचून

होते. तसाच प्रयत्न डॉक्टरानी केला आहे. फक्त त्यांचा कथानायक स्वप्नातून जागा होतो एवढाच फरक .

कोणत्याही विज्ञान कथेमध्ये सध्या जे विज्ञानाने सिद्ध केले आहे त्यापुढील विज्ञान काय असेल याची कल्पना आजच्या विज्ञानावर बेतता आली तर वाचकांना अशी कथा अधिक जवळची वाटते. नाहीतर आपल्या लहानपणी गुलबकावलीचे फूल आणण्यासाठी राजकुमार व त्याला अडचणींना द्यावे लागलेले तोंड ही शेवटपर्यंत फॅन्टसी वाटत राहते. तसे डॉ नितिन मोरे यांच्या कथेचे कोठेही झाले नाही. त्यांच्याकडून आणखी कसदार विज्ञान कथांची अपेक्षा आहे. लवकरच त्यांचे दुसरे पुस्तक अधिक मनोरंजक कथेसहित येईल अशी अपेक्षा

मोहन मद्वाण्णा

विज्ञान प्रसारक मराठी विज्ञान परिषद

तीन विज्ञान पुस्तकांचे लेखक- ई साहित्य

ता 30/08/2020

# *हिरव्या बोक्याची गोष्ट !*

प्रोफेसर नागेश गणपत्ये.

मुलं त्यांना वनस्पत्ये म्हणतात!

वनस्पतीशास्त्र त्यांचा प्राण. एखाद्या झाडपाल्याच्या काढ्यासारखे ते कोळून प्यायलेला माणूस. शिकवणे उत्तम पण त्यांना मुलं घाबरून राहात. माणूस तसा साधा पण तिरसट. काहीसा उद्धट म्हणा. म्हणजे काही वेळेस उद्धटपणाला फटकळपणा किंवा स्पष्टवक्तेपणा म्हणून खपवले जाते, पण प्रोफेसरसाहेब जेन्युईन उद्धट. त्याबद्दल त्यांना काही वाटायचे पण नाही. हिरव्या झाडांत राहूनही पिवळा माणूस असे काही म्हणायचेही, अर्थात ते त्यांच्या पाठीमागे. हिरवाईत राहूनही माणूस असा राहू शकतो? म्हणजे राहू शकतोच..कारण प्रोफेसर त्याचे जिवंत उदाहरण समोर. त्यांच्या तिरसटपणापायी बायको

सोडून दूरदेशी करियरच्या नावावर गेलेली. मूल बाळ नाही. झाडं, पानं, फुलं, मुळं नि रोपं यातच त्यांचे जीवन सामावलेलं.

नाही म्हणायला एक नागोजी त्यांच्याबरोबर. नागोजी म्हणजे त्यांचा नोकर. सावलीसारखा त्यांच्यामागे. तो ही एकटाच. साहेबांनी दहा वर्षांपूर्वी गावाहून आणलेले. बाकी कोणाबरोबर साहेब कसेही वागोत, नागोजी बरोबर नाही. साहेबांना अभ्यासाला वेळ मिळावा म्हणून ते मुद्दाम तिरसट वागतात असे मात्र नागोजीला वाटते. तसा तो त्यांचा ब्ल्यू आइड बॉय जणू ! आणि एक. म्हणजे त्यांचा लाडका पांढराशुभ्र बोका! नागार्जुन ! थोडक्यात त्यांच्या छोटेखानी बंगल्यात नागेश, नागोजी आणि नागार्जुन असे त्रिकूट ! बंगलाही कसा? एका खोलीत पुस्तकांचा अवाढव्य पसारा, दुसरीत साहेबांची लॅब. तासनतास पानंफुलं घेऊन बसणारे प्रोफेसर साहेब. मधून मधून जंगलात झाडांच्या नमुन्यांसाठी नागोजी बरोबर भटकंती.

तिरसटपणा जमेस धरूनही त्यांना त्यांच्या क्षेत्रात मानाचे स्थान आहे. नाव मोठे त्यांचे. ‘इंटरनॅशनल जर्नल ऑफ

बॉटनी’मध्ये ते नियमाने लिहीतात. ‘द ट्री’ च्या तर ते संपादकमंडळात आहेत. असे सारे आहे.

***

नागोजी एकदिवस त्यांना सांगायला आला,

"साह्येब, गावी थोडे पयसे धाडायचे हायेत, माय एकटी, तिला पाह्यला कोण नाय, पोटापाण्याचा प्रश्न साह्येब.."

"किती देऊ?"

"द्या साह्येब समजून..पन द्येवानी ह्ये पोट दिलं नसतं तर?"

प्रोफेसरसाहेबांना नागोजीची दया तर आलीच. आपल्याकडील चार पैशांनी कोणाची भूक भागत असेल तर छानच म्हणून त्यांनी त्याला पैसे देऊन त्याची बोळवण तर केली पण तो पोटापाण्याचा प्रश्न त्यांच्या डोक्यात घुमत राहिला. ‘कशासाठी पोटासाठी’ किंवा ‘पोटापुरता पसा पाहिजे’..वगैरे ललित विचार त्यांच्या डोक्यात येण्याची शक्यता नव्हतीच हे खरे. पण कुठे तरी एक ठिणगी पडली. ठिणगी पडायची वेळ मुहूर्ताचीच असावी बहुधा. म्हणजे न्यूटनने काय सफरचंद पहिल्यांदाच पडताना पाहिले? की जेम्स वॅटनी किटलीचे झाकण वाफेने पहिल्यांदाच उडताना पाहिले? त्या गोष्टीची वेळ

यायला ठिणगी पडावी लागते. म्हणजे पहा, पोटाची भूक नागोजीला आहे तशीच साहेबांना पण. दोघांची धडपड पोटासाठीच. असे असले तरी एकाएकी हा पोट नसते तर हा नागोजीचा प्रश्न प्रोफेसरांना का सतवावा? झाडपाला खाऊन माणूस जगतो..प्राणिमात्र जगतात..एका प्राण्याला दुसरा खातो. जीवन साखळी सुरूच राहते. मग मेलेला प्राणी मातीत मिसळतो..धरणीत मिसळला की त्याची पोषक द्रव्ये परत मातीत..मग झाडे ते शोषून घेतात..आणि बनवतात ते अन्न..अन्न..

अन्न..अन्न.. त्यांच्या डोक्यात घुमत राहिले असावे. रात्री ते झोपले तेव्हाही त्यांना दिसत राहिली ती झाडे..अन्न.. नागोजीच्या न पाहिलेल्या आईचे खपाटीला गेलेले पोट.. हातात कटोरा घेऊन भीक मागणारी मुलं.. त्याचबरोबर पंचतारांकित हॉटेलातल्या कॉन्फरन्स मध्ये उंची जेवण.. मग कुठे अन्नाची नासाडी करणारे लोक.. कुठे लक्ष्मीचा वरदहस्त म्हणून शेखी मिरवत ताटात अन्न सोडणारे लोक..

भूक.. पोट.. अन्न.. भूक.. उदरभरण मग ते भिकाऱ्याचे असो की कोणा पोट पुढे आलेल्या शेटजीचे असो.. अन्न आणि

पोट भरणे यावरच जग चाललंय.. आणि या सर्वांच्या मुळाशी कोण? तर त्यांच्या लाडक्या वनस्पती.. येस.. झाडे.. ही झाडेच सृष्टी जगवतात.. मनुष्यास नि प्राण्यांस.. त्यांना आपल्या झाडांबद्दल अतीव प्रेम दाटून आलं आणि कृतज्ञतेने भरून आले.. त्यांनी घडाळ्यात पाहिले तेव्हा पहाटेचे चार वाजलेले..

सहाच्या ठोक्याला उठण्याचा शिरस्ता प्रोफेसरांनी कधी सोडला नाही. आज छान हवा पडलेली. नागोजी झोपलेला बाहेर. आज ते वेगळ्या वाटेने अर्धा रस्ता पोहोचले तसे त्यांना एकाएकी काहीतरी सुचल्यासारखे वाटले.. होय.. झाडे बनवतात अन्न.. मग माणसात काय आहे कमी? अन्नधान्यात स्वयंपूर्ण म्हणजे काय नुसतेच जास्त अन्नधान्य पिकवणे? आणि ते घ्यायला पैसेच नसतील तर? नो.. असे नाही.. माणसानेच माणसाचे अन्न बनवायला हवे. किंवा मग कमीतकमी त्या नागर्जुनाने तरी का बनवू नये स्वत:चेच अन्न? झाडाप्रमाणे?

शेवटचा झाडाप्रमाणे शब्द त्यांच्या डोक्यात फिरत राहिला.. प्रोफेसर घरी आले.. नागोजीने टेबलावर त्यांच्यासाठी

नाश्ता ठेवलेला. आणि नागार्जुनसाठी दीड पेलाभरून दूध एका ताटलीत. साहेब खायला बसले. नि नाग्या बोका लपलप जिभेने दूध पिऊ लागला. प्रोफेसरसाहेबांची कडक ऑर्डरच नागोजीला.. नाग्याबोक्याला दीड पेला दूध द्यायलाच हवे...

***

साह्येब म्हणतात नाग्याला आता कमी दूध दे.. नागार्जुन हल्ली जरा सुस्त दिसतोय.. उंदीर पकडायची हौस भागली की काय याची? दूध प्यायचा वेग पण कमी होताना दिसतोय.. साहेब हल्ली ह्या नाग्याला घेऊन काय करतात? .. नाग्या रोज थोडा विव्हळतो.. कसले विण्जेक्शन मारतात की काय?.. असणार.. रोज त्या बोक्याला सुई टोचतात.. नाग्याची प्रकृती मात्र सुधारतेय.. साहेबांना विचारू?.. नको.. एवढा मोठा साहेब.. मला कशाला काही सांगेल.. नि सांगितलं तरी मला काय कळणारे त्यातलं.. पण साह्येब हल्ली लय बिझी दिसतात.. कॉलेजातनं येतात नि पुस्तकं पसरून बसतात.. मग तासनतास त्या नाग्याला घेऊन लॅब मध्ये.. मग रोज नाग्याचा हळूच विव्हळण्याचा आवाज.. रोज हल्ली बसतात नाश्त्याला.. पण नाग्याला हल्ली दूध एकच पेला द्यायला

सांगतात साहेब.. आणि नाग्याचं पण पोट भरतंय त्यानी.. आता तर अर्धा पेलाच सकाळी पितो.. आणि साह्येबांबरोबर बाहेर पडतो नाग्या.. त्याला घरात नाय घ्यायचं दिवसभर.. पडू दे उन्हात बाहेर.. साडेपाचाला साहेबांबरोबर तो घरात शिरतो.. रोज खाणं पिणं नाही.. पण दिसतो कसा मस्त.. उगीच नाही बोका म्हणतात बोक्याला.. आणि आजकाल कसा हिरवट दिसायला लागलाय.. उन्हात माणूस काळा पडतो नि हा बोका काय हिरवा पडतो की काय?

नागोजीच्या या दिवसेंदिवशीच्या विचारचक्रात मग एके दिवशी खंड पडला...

एके दिवशी नागोजीला एक हिरवागर्द प्राणी दिसला घराबाहेर. आणि दरवाजा उघडताच तो घरात शिरला. नागोजी काठी घेऊन लागला त्याच्यामागे नि त्याचा म्यांव चा आवाज ऐकताच कळाले त्याला, हा तर नागार्जुन ! नशिब नाग्याबोक्याच्या पाठीत ही काठी नाही हाणली! म्हणजे हा नाग्या आता हिरवा गार झाला? झाडाप्रमाणे? मांजरं असतात पांढरी नि काळी, पण हिरवी? पहिल्यांदाच पाहतोय..

***

संध्याकाळी साहेब खूप खुशीत असल्याचे नागोजीला जाणवले.

"साह्येब, साह्येब, आक्रित झालं.. तो नाग्याबोका.. झाडावानी हिरवा पडलाय.."

"अरे नागोजी, म्हणूनच तर मी खूश आहे रे. अरे माझ्या बोक्या..नाग्या..नागार्जुना.."

नाग्या धावत आला नि साहेबांनी त्याच्या हिरव्या अंगावर प्रेमाने हात फिरवला.

"नागोजी, लवकर तयारीस लाग. चहा टाक नि खायला कर, माझे काही विद्यार्थी नि ते पाटील नि मिश्रा सर येतील इतक्यात. आणि लवकर संपवून तू पण ये बाहेर.. आज मी खूपच खूश आहे रे.. माझ्या बोक्या! याला काही खायला द्यायची गरज नाही बरं का रे, याचं पोट भरलंय अगदी.. हो की नाही रे नागार्जुना?"

नागार्जुनाने मग आपली हिरवी शेपूट होकारार्थी हलवली.

थोड्या वेळातच सारे हजर झाले. मध्ये सर म्हणजे प्रोफेसरसाहेब नि हीरो सारखा हिरवा बोका त्यांच्या मांडीवर. बाजूला सारे बसलेले नि जमिनीवर नागोजी आज पहिल्यांदाच काहीतरी साहेबांचे शिकवणे अटेंड करायला बसलेला.

"काँग्रॅट्स सर. खरंच किती हिरवागार दिसतोय हा बोक्या."

"हो ना सर.. इट्स अमेझिंग सर, हिरवं मांजर !"

साहेबांनी सुरू केलं,

"ह्या हिरव्या बोक्याचं सारं श्रेय या नागोजीला बरं कारे.."

सगळया नजरा नागोजीकडे वळल्या तसा नागोजी लाजल्यासारखा झाला.

"ह्या नागोजीला प्रश्न पडला पोट नसतं तर? आता ते तर शक्य नाही. पण आपण आपलेच अन्न बनवू शकलो तर? झाडे कशी बनवतात, तसे माणसाला का जमणार नाही? अर्थात नाही जमत कारण झाडे सूर्यप्रकाशापासून आपले अन्न बनवतात. त्यासाठी त्यांच्यात क्लोरोप्लास्ट असतात हे तर आपल्याला माहितीय. त्यात ते हिरवे रंगद्रव्य असते, क्लोरोफिल नावाचे. त्यामुळे ते सूर्यप्रकाशाचे रूपांतर आपल्या अन्नात करतात. याला फोटोसिंथेसिस म्हणतात हे आपल्याला ठाऊक आहे.

आता तो प्रकाश तर आपल्याला मिळतो पण आपल्याकडे क्लोरोप्लास्ट नाही. म्हणून आपण झाडांवर अवलंबून आहोत."

"पण सर काही प्राणी तर करतात ना फोटोसिंथेसिस ?"

"तुझं खरंय, पण ते अगदी मर्यादित ऊर्जा लागणारे आदिम जीवांसारखे प्राणी आहेत. वाघ सिंहासारखे सोडा पण मुंगीसारख्या छोट्या जीवांनाही हे शक्य नाही. कारण त्यांच्याकडे हे क्लोरोप्लास्ट नाहीत."

"म्हणजे सर तुम्ही या बोक्यात क्लोरोप्लास्ट घातलेत?"

"यस, यू आर राईट. पण तरीही एक मोठी अडचण होती. झाडे काही हलत नाहीत प्राण्यांसारखी. म्हणजे त्यांना त्यात आपली ताकद किंवा ऊर्जा घालावी लागत नाही. थोडक्यात त्यांचे एनर्जी एक्सपेंडेचर कमी. प्राण्यांना धावावे लागते, त्यासाठी प्रचंड ऊर्जा खर्च होते. ती या सूर्यप्रकाशातून कशी मिळणार?"

"कशी काय सर?"

"अरे नाहीच मिळणार. आणि काय आहे की झाडे पण जेवढा सूर्यप्रकाश पडतो ना त्याच्या दहा वीस टक्क्यांचाच

वापर करू शकतात. त्यामुळे कितीही क्लोरोप्लास्ट मी त्या बोक्याच्या पेशींत इंजेक्ट केले तरीही त्याला अन्नपुरवठयास पुरेसे पडणार नाही हे मला दिसत होते. तर मी त्या क्लोरोप्लास्टनाच थोडे माॅडिफाय केले, म्हणजे त्यांच्यातच जनुकीय बदल घडवला, तो असा की ते आता जास्त म्हणजे सत्तर ऎंशी टक्के सूर्यप्रकाश वापरून अन्न बनवतील. म्हणजे या बोक्याचे निदान निम्मे पोट तरी भरेल दिवसभरात. बाकी खाणे पिणे आहेच की नाही."

"सर ग्रेट !"

"खरंच सर हा बोका एव्हरग्रीन आहे म्हणायचे तर !"

"हो ना ! एव्हरग्रीन!"

***

नागोजी कान देऊन ऐकत होता. त्याला कितीतरी दिवसांपासून पडलेल्या प्रश्नांची काही उत्तरे मिळाली होती, नि काही त्याच्या आकलनाच्या बाहेर होती. पण आज साह्यबांनी काही तरी मोठे काम केलंय एवढे त्याला जाणवत होते. साहेब खूश झाल्यावर त्यांचा तिरसटपणाचा मागमूस आज दिसला नाही, म्हणजे आपल्या अभ्यासात कोणी अडथळे नको

आणायला म्हणून ते तसे करतात ह्या आपल्या मताबद्दल त्याला अजून खात्री पटली. एवढ्या दिवसातल्या नाग्याबोक्याच्या वागण्याचा नि त्याच्या हिरव्या रंगाचा ही उलगडा झाला त्याला. म्हणजे दिवसभर बाहेर सूर्यप्रकाशात जेवण बनवतो तो स्वत:चे तो हिरवा बोका. आणि आता दिवसेंदिवस आळशासारखा पडून असतो.

नागोजीच्या मनात एकाएकी काय आले की जाऊन साहेबांपुढे उभा राहिला,

"साह्येब थोडं बोलायचंय.."

"बोला नागोजीराव, बोला.."

प्रोफेसर त्याच्याकडे कौतुकाने पाहत बोलले

"काही नाही साहेब," नागार्जुनकडे पाहात तो म्हणाला, "एक विचारू साहेब?"

"बोल नागोजी."

"असा हिरवा मानूस नाय ना बनवणार तुम्ही?"

"का रे?"

"नाही म्हणजे पोटाचाच प्रश्न सुटला की तर माणसाचं काय खरं नाही."

"म्हणजे रे?"

"म्हणजे साहेब, सारी लढाई पोटासाठी आहे पण पोटच नसले तर माणूस ऐदी बनणार नाही ना? आधी मीच बोललो पोट नसतं तर आज बी मीच बोलतो..पोटाचा प्रश्न सुटला तर..तर बी कठीणच हाय माणसाचं."

आधी पोटाचा प्रश्न आणि आता पोटाचा प्रश्न सुटला तरी प्रश्नच? प्रोफेसरसाहेब पुन्हा एकदा विचारात पडले. ते ही नागोजीच्याच प्रश्नाने. जड आवाजात ते नागोजीला म्हणाले,

"खरंय बाबा नागोजी तुझे.."

## *रॉबिनहूड ची गोष्ट !*

गव्हर्नमेंट मेडीकल कॉलेजचे पॅथॉलॉजी डिपार्टमेंट. लेक्चरर डॉ.अंशुमन कानडे.

नवीन पोस्टिंग, आजपासून पीएम म्हणजे पोस्टमॉर्टेम मध्ये. पॅथॉलॉजीच्या वेगवेगळ्या विभागांतून फिरून आता पोस्ट्मॉर्टेम मध्ये. हा त्याचा विशेष आवडता नि हातखंडा विषय. फॉरेन्सिक पीएम पॅथॉलॉजीत येत नसली तरी त्यात तो एक्सपर्ट. इतका की फॉरेन्सिकवाले पण त्याला गुंतागुंतीच्या केसेस मध्ये बोलावीत.

आज जॉईन झाला अंशुमन आणि आजच संध्याकाळी इमरजंसी कॉल ! तो घरून निघाला.

"वामन्या ब्रो, जाऊन येतो रे."

"मी सांगितलेले लक्षात आहे ना रे अंशु?"

"यस माय ब्रदर, विल डू द नीडफूल. मी आता निघतो."

पॅथॉलॉजी पीएम रूम म्हणजे मोठे बेड वजा टेबल. वेगवेगळी चिरफाडीची आयुधे, स्कल म्हणजे कवटी उघडायला करवतीसारखी हत्यारे आणि हे सर्व सांभाळणारा जिवाजीमामा.

पीएम रूम मधला वास नाकात घेत अंशुमन म्हणाला,

"जिवाजीमामा सारे तय्यार?"

"होय सर."

"असणारच ! जिवाजीच्या जीवावर पीएम रूम चालते."

"काय सर थट्टा करताय? पण आज खूप दिवसांनी?"

"हो रे, वेळच नाही बाबा, ब्लड बॅंकेतून निघायला."

कित्येक महिन्यांत अंशुमनची फेरी झाली नव्हती पीएम मध्ये. अगदी हिस्टोपॅथो नंतर ब्लड बॅंकमध्ये तो गळ्यापर्यंत बुडालेला. अर्थात काही चॅलेंजिंग नसेलही पीएम मध्ये नाहीतर त्याला बोलावणे गेल्याशिवाय राहिले नसते.

"चल घे लवकर. आणि एक खाली जार घे."

"कशाला?"

"घे तर जिवाजीमामा, स्टराईल हवे."

"पीएम मध्ये स्टराईल? बरं घेतो साहेब."

अंशुमनसर पॅथोत लाडके. आणि जिवाजी त्या पीएमरूमचा जणू प्राण ! पंढरपूरची वारी करणारा नि तुळशीमाळ घालणारा जिवाजी त्या पीएमरूमच्या वातावरणात विजोड वाटायचा. पण कामासाठी सारेच त्याच्यावर विसंबून असायचे. आता टेबलावर डेड बॉडी आणि समोर जिवाजी तयार.

"सर, मृतव्यक्तीवर कोणीतरी हल्ला केलाय लाथाबुक्क्यांनी. पोटाला मार लागला असावा कारण हेडइंज्युरी दिसत नाहीये," जिवाजी म्हणाला.

"हं." अंशुमन.

जिवाजीने सराईतपणे मधोमध इन्सिजन घेतले. व्हिसेरा काढला. मग छाती उघडून हृदय नि फुफ्फुसं बाहेर. स्कल उघडायची पाळी आली.

"जिवाजी थांब. तो मेंदू माझ्यासाठी ठेव. राहू दे, मी येतो."

हळुवार हातांनी अंशुमनने आधी सीएसफ रिकाम्या जार मध्ये गोळा केला, मग मेंदूचा पुढचा फ्रॉटल लोब नि त्यामागचा थोडा भाग काढला नि त्या जार मधे घातला.

जिवाजीला काही तरी आक्रित घडतंय असे वाटले पण तो काही बोलला मात्र नाही. समोरच्या जार मध्ये सीएसएफ मध्ये मेंदू विसावला. अंशुमनने वामनला तसा फोन लावला,

"ये लवकर."

आणि पुढील दोन मिनिटांत वामन हजर !

"इतक्यात? काय सुपरसॉनिक जेट की काय?"

"नाही रे. आय वा ॅज रेस्टलेस ॲट होम. तुझ्यामागे मी पण येऊन बाहेरच थांबलो होतो अंशु, बरं दे मला. मी निघतो."

तो जार घेऊन वामन तडक घरी निघाला. अंषुमन आपला पेपरवर्क करत बसला.

त्याच्या डोळ्यांसमोर तो कालच दुपारचा प्रसंग आला.

वामन, तो आणि रॉबिन. रॉबिनने समोर कॉफी आणि चहा आणून ठेवला. वामन कॉफी पितो नि अंशुमन चहा. रॉबिनची

चूक कधी होत नाही. कधी साखर कमी नाही की जास्त नाही. कधी कपातून सांडणे नाही. कधी चारवाजेनंतर एक मिनिटाचाही उशीर नाही. चहा कॉफी झाल्या झाल्या रॉबिन कप उचलून धुवून ठेवी त्यात कधी चूक नाही.

आज अंशुमन खूश होता. मिरन भेटल्याने.

"काय आज गाडं खुशीत अगदी?" वामन म्हणाला.

"अरे ब्रो, व्हेन वाॅज आय सॅड एव्हर? एनी वे आज सॉलिड धमाल झाली लॅब मध्ये."

"काय रूपाली भेटली की नाही?"

रूपाली ! कित्येक महिन्यांपासून अंशुमनच्या मागे लागलेली. नि अंशुमन तिला टाळता टाळता थकून गेलेला !

"अरे तीच तर धमाल ! मी रूपाली वर गोष्ट लिहीलीय, रू-पाली वर."

"रू-पाली?"

"यस माय ब्रदर रूssपाली. ऐकवू?"

मग अंशुमन त्याला रूपाली ची गोष्ट ऐकवू लागला. त्यामागे रूपाली सारख्याच पांढ-याफटक पालीचा संदर्भ.

दोघांची ती गोष्ट ऐकता ऐकता पुरेवाट झाली. अगदी डोळ्यात पाणी आले.

वामन म्हणाला, "काय रॉबिन आहे की नाही धमाल रूपाली वहिनींची?"

"वहिनी?" अंशुमन

पण वामनचे लक्ष रॉबिनकडे लागलेले. त्याने रॉबिनकडे टाळी मागायला हात पुढे केला. पण रॉबिनकडून काहीच उत्तर नाही.

हसता हसता वामन एकदम सीरियस झाला.

"अंशु.. यू सी .."

वामन इंग्लिश बोलतोय म्हणजे काहीतरी गंभीर आहे हे अंशुमनला ठाऊक आहे.

'रॉबिन शुड रिस्पाँड. ही शुड लाफ विथ अस."

अंशुमन काहीच बोलला नाही.वामन अस्वस्थ आहे एवढे मात्र त्याला जाणवल्यावाचून राहिले नाही.

त्या दिवशी भर मध्यरात्री एकाएकी वामन अंशुमनला उठवत म्हणाला,

"अंशु, यू कॅन हेल्प."

अंशुमन मिरनची स्वप्ने पाहतोय त्यात ही झोपमोड.

"कशाबद्दल? झोपू दे आता." अंशुमन

"ऐक, उठ, गेट अप अँड लिसन."

नंतर खूप वेळ वामन त्याला काहीतरी सांगत होता नि अंशुमन आपल्या इंजिनयर भावाचे कौतुकाने ऐकत बसला होता. वामनला त्या रात्री झोप आलीच नाही. त्यानंतर लगेचच हे पीएम. सकाळीच तो पीएम विभागात आलेला नि आता हा इमरजंसी कॉल!

घरी आल्यावर वामन त्या फ्राँटल लोबकडे पाहत बसला थोडा वेळ. रॉबिनची झोपायची वेळ झालेलीच. अंशुमन परतला तेव्हा रॉबिन वामनच्या मांडीवर होता.

"गुड यू हॅव कम अंशु, इट इज स्टिल व्हायटल.. जस्ट होल्ड धिस."

रॉबिनला उपडा पकडून वामनचे काम चालू होते. अगदी एकाग्रतेने. वामनला अशा वेळी बोललेले चालत नाही.

अंशुमनला फक्त बघायचे काम. रूममध्ये नुसताच सोल्डरिंग, कटिंग नि कॉटरीचा आवाज. पहाटेपर्यंत वामनचे काम चालू नि असिस्टंटच्या रोल मध्ये अंशुमन.

सकाळ झाली तसा वामन म्हणाला, "आय थिंक आय हॅव डन इट! कीप युवर फिंगर्स क्रा◌ॅस्ड."

"आता काय वामन?"

"चोवीस तास. मी हा सीएसएफ पंप चालू ठेवतो. तू फक्त हे एलेक्ट्रीक चार्जर ऑन ठेव."

"मी जाऊ हॉस्पिटलात? दुपारी येतो"

"ओके, पण मी इथून हलत नाही. हा पंप महत्त्वाचा. तू जेवण बनव. मला खाऊ घाल. मी रॉबिनकडे पाहातो."

"ओके वामन, मी पाहतो सारे. उद्या पर्यंत सगळे ठीक होईल."

"हो, लेट्स सी."

चोवीस तास उलटले. वामनने सारी कनेक्शन्स चेक केली. अंशुमन बाजूला उभा. दोघांनी रॉबिनला उभे केले. रॉबिनच्या

ओठांची थोडी हालचाल झाली. दोन पावले टाकत रॉबिन पुढे झाला. सकाळच्या प्रोग्रामप्रमाणे तो किचनकडे वळाला तसा वामन म्हणाला,

"रॉबिन थांब."

तसा रॉबिन थबकला.

"बस थोडा. जरा या अंशुमनची गोष्ट ऐकूया. अंशु सांग रे ती रूपाली आम्रपालीवाली गोष्ट."

अंशुमनने सुरूवात केली.

"ऐक आता ही आम्रपालीची गोष्ट. रूपालीवरून सुचलीय, ऐक..

*आम्रपालीची गोष्ट*

*राणी रू-पाली चा मेसेज आला तशी पाल आळस झटकून उठली. जायचा तिला कंटाळा होता पण जाणे भाग होते.*

*आय हॅव टू गो-पाल. ती स्वत:शीच म्हणाली.*

*यू कॅन नॉट गो-पाल, राणी रू-पालीच्या महालाबाहेरील द्वार-पाल म्हणाला.*

*व्हाय? व्हाय कान्ट आय गो-पाल? मला राणी रू-पालीने बोलावलेय.*

*राणी रू-पाली? ओके. ओके. देन गो-पाल.*

*मग पाल जाऊन राणी रू-पालीच्या पुढे उभी राहिली. राणी रू-पाली ने तिला पाहिले नि ती कडाडली,*

*भला ये पाल मेरे से सफेद कैसे?*

*इसका कारण मैं वापरती हूं टिनो-पाल रानी-पाल.*

*तिचे उत्तर ऐकून राणी रू-पाली अजून चिडली.*

*कोण आहे रे तिकडे?*

*राम-पाल नि महि-पाल आत आले.*

*जा सोडून या हिला, राणी रू-पालीचा आदेश.*

*कुठे राणी रू-पालीजी?*

*कुठे काय? ने-पाल*

*जशी आज्ञा.*

*मग महि-पाल नि राम-पाल पालीला घेऊन ने-पालला गेले. तिथल्या जंगलात एका आंब्याच्या झाडावर तिने आपले*

*घर बनवले. तेव्हापासून ती आम्र-पाली म्हणून ओळखली जाऊ लागली.*

*खरे तर ही सत्य घटना आहे पण तुमचा विश्वास नाही बसला तर मी काय करणार क-पाळ?*

संपली ही आम्रपालीची गोष्ट !"

"वा ! छान अंशुमन ! पालीवर गोष्ट ! मस्तच. होय की नाही रॉबिन?"

वामन म्हणाला आणि टाळीसाठी त्याने हात रॉबिनपुढे धरला. क्षणात रॉबिनचे डोळे लकाकले. त्याने देखील हात पुढे केला नि वामनला टाळी दिली.

अंशुमन आणि वामन एकमेकांकडे पाहून हसले.

"रॉबिन माय डियर," वामनने त्याच्या गालाचा मुका घेतला.

वामन नि अंशुमन दोघे एकदम आनंदित झाले. त्याला कारणही तसेच होते. जगातला पहिला इमोशनक रोबो त्यांनी बनवला होता.

"खूश ! लेट्स सेलिब्रेट यार. रॉबिन जरा मिठाई आण!"

रॉबिन आपल्या चालीने आत गेला. तसा वामन म्हणाला,

"बघ अंशु, अॅज आय टोल्ड यू. या रॉबिनमध्ये या फंक्शनल मेंदूचा भाग कसा मस्त फिट झालाय. नशिबाने आपल्याला असा फ्रेश मेंदू मिळालाय. मी काय केले ना की फ्राँटल लोब नि अॅमॅगडिला हे ब्रेनचे पार्ट याच्या सर्किटमध्ये इंटिग्रेट केले. अगदी परफेक्ट झालंय. मेंदू बहुधा सगळ्याच प्राण्यांत असतो पण मानवाएवढा विकसित तो कुठेच झालेला नाहीये. नि आपल्या भाव भावना म्हणजे इमोशन्स या फ्राँटल लोब नि अॅमॅगडिला मधूनच कंट्रोल होतात. याचे सिग्नल्स मी त्याच्या बाकीच्या सर्किटमध्ये जोडले ते आता काम करू लागलेयत."

"खरेय वामन्या ! द इमोशनल रोबो ! आता तू खरा बायोमेडिकल इंजिनियर शोभतोस ! ग्रेट !" अंशुमन म्हणाला.

"हं. आता हा रॉबिन नुसता रोबो नाही ! आता हा आमचा खरा मित्र झालाय अंशू."

"रॉबिन नाही आता रॉबिनहूड !"

# *काल यंत्र!*

तो आणि मी..

मी होतो त्याचा जानी दोस्त. म्हणजे मी होतोच दोस्त त्याचा. पण जानी म्हणजे कसा? पूर्वी लंगोटी यार म्हणायचे तसा? माझी मैत्री होती.. यारी होती. तो सगळ्या गोष्टी सांगायचा मला त्याच्या मनातल्या.

माझ्या नि त्याच्यात खूप फरक. तो अभ्यासात हुशार. विज्ञानाची आवड त्याला. त्यात लिहायचाही भारी.

आम्ही एकाच कॉलेजात होतो.. पण तो सायन्सचा विद्यार्थी.. मी मराठीचा. असे असले तरी त्याला माझ्याहून जास्त लिहायची आवड. छंद म्हणा. आपली मोठाली पुस्तके वाचत मध्ये लिहायला कसा वेळ मिळायचा त्याला कुणास ठाऊक. त्यात परत शास्त्राचा क्लिष्ट अभ्यास. त्यात त्याला चांगलीच गती होती. मी पहायचो ना.. त्याला परीक्षेत मार्क्स

चांगलेच असायचे. आणि मी? इकडे भाषाविषयातली गाडी रडतखडत ढकलत होतो.

असे असले तरी मला त्याचा हेवा नाही वाटायचा. कारण त्याच्यासारखी दिनरात मेहनत करायची मला नाही वाटत माझ्या मनाची तयारी होती. तो रात्री दिवे जाळत वाचत बसायचा तेव्हा मी सुखाने स्वप्ने पाहात झोपलेला असायचो. तो वेड लागल्यासारखा गुंतलेला असायचा. हे काही माझ्याने होणारे नव्हतेच.

त्याच्या त्या सदा व्यस्तपणाला अपवाद फक्त आमच्या उन्हाळी सुट्टीचा. तेव्हा तो मोकळेपणाने गप्पा मारत बसायचा. त्याचे स्वप्न होते ते शास्त्रज्ञ बनावयाचे. मला वाटायचे त्याला स्वप्ने पण तशीच पडत असावीत नेहमी. वाटायचे म्हणजे काय.. तो सांगायचाच.. "कल्पना कर.. मी मोठ्या लॅब मध्ये आहे.. लांब ॲप्रन घालून. माझ्या अवतीभवती सगळे विद्यार्थी जमलेत.. मी प्रयोगामागून प्रयोग समजून सांगतोय.."

किंवा कधी म्हणायचा.. "आपल्याने ना असे काही संशोधन झाले पाहिजे ना की जगात दखल घेतली गेली पाहिजे.."

आणि मला वाटायचे.. तो हे करू शकेल असे बहुधा.

सुट्टी लागली की याच्या कल्पनांचा वारू उधळायचा. आपल्या देशी दिमागसे नवनवीन काही बनवायचा तो. 'देशी दिमाग' हा त्याचाच शब्द. मग कधी तो त्याच दिमागाचा वापर करून विज्ञानकथा लिहीत बसायचा. लिहायचा चांगले. मी खरा भाषाविषय घेतलेला. पण लिहायचा कंटाळा मला. आणि हा सुट्टीत तीन चार तरी विज्ञानकथा प्रसवायचा.

त्याच्या गोष्टी पण वेगवेगळया विषयांवर असायच्या. कधी डायनोसॉरबद्दल. कधी अवकाशात घडणाऱ्या. कधी भूतकाळातील तर कधी भविष्यातील! कल्पनेच्या भराऱ्या विज्ञानाच्या जोडीने येत त्याच्या गोष्टीत. मी म्हणालो ना मला हेवा नाही वाटायचा त्याचा .. त्याला हा एकमेव अपवाद.. त्याच्या त्या भाषेचे मला अप्रूप होते. खोटे कशाला सांगू, थोडीफार असूया ही होती. इकडे मी स्वतः भाषेचा विद्यार्थी

असूनही त्याला माझ्याहून जास्त भाषा येत असावी? तीही ललित कथा लिहिण्याइतकी? ललित असल्यातरी तो विज्ञानकथाच लिहायचा. खरेतर उलट म्हणायला पाहिजे.. विज्ञानकथा असल्या तरी तो त्या ललित साहित्यासारखाच लिहायचा.

सुट्टी लागली की त्याचे डोळे चमकायचे. एरव्ही अभ्यासाच्या धबडग्यात तो पार बुडलेला.. आता आपल्या छंदात मग्न व्हायला मोकळा. मला कळो न कळो.. त्या विज्ञानातल्या संकल्पना मला सांगत बसे. कधी डोक्यातल्या विज्ञानकथांचे विषय.. आणि त्याच्या डोक्यातल्या कल्पना यांच्याबद्दल बोलणे होई. माझा सहभाग यात श्रोता म्हणून असायचा. तो एकूण तसाच असणार होता कारण मी तसा जात्याच आळशी होतो ना. आणि त्या विषयात माझी गती तशी मंदच होती, किंवा खरेतर नव्हतीच!

त्याचे ऐकून ऐकून वाटू लागले.. की बहुधा या सर्व विज्ञानकथावाल्यांचा लाडका विषय असावा कालयंत्र.. अर्थात टाईम मशीन.. कारण तो खूपदा त्याबद्दल बोलायचा.

आणि त्यात त्याचे अजून एक स्वप्न.. एक असेच टाइममशीन बनवायचे..जुन्या किंवा पुढच्या जगाची सैर करून यायची! ती ही कितीही कालापुढे वा मागे.. शतकेच नाहीत तर लाखो वर्षांमागे जायचे.. नि परत यायचे. त्याच्या डोक्यात याच कल्पना घोळत असायच्या सदा. तशी या वर्षी सुट्टी सुरू झाली त्याची तीही याच धुंदीत असावी. पोरे कशी परीक्षा झाली की हुंदडतात.. सिनेमे काय पाहतात.. भटकतात इकडे तिकडे.. आणि हा..परीक्षेहून तडक परत आला नि कामाला लागला!

मला म्हणायचा.. "बघच हे माझे टाईममशीन बनते की नाही!" मग तासनतास त्यात बुडलेला असायचा तो. रात्री बसून आपल्या लिहायच्या गोष्टींत मग्न.. मध्ये कधी माझे मत घ्यायचा गोष्टीवर. मी सुद्धा काही मोठेपणाचा आव आणत त्याला मत सांगायचो. यावेळी मात्र त्याने गोष्ट फारच सुरस आणि सुंदर रचली होती. चंद्रावरची वस्ती आणि त्यावर त्याची कल्पनाशक्तीची भरारी! छान! मी म्हणालो देखील त्याला.. पाठवून दे विज्ञान परिषदेच्या स्पर्धेत! बघू! म्हणून तो आपल्या कामात गढला. गोष्ट छानच होती.. कल्पना आणि विज्ञान

दोघांच्या मिश्रणातून बनलेली. एखाद्या कसलेल्या sci fi लेखकाप्रमाणे जमलेली. जाता जाता हे सांगायला हवे.. त्याच्यामुळे मला या विज्ञानकथांची चांगलीच गोडी लागली होती. आणि मी त्या रस घेऊन वाचू लागलो होतो. प्रत्यक्ष विज्ञानाशी माझा संबंध एवढाच होता आजवर!

काही असो.. गडी एकदम फोकस्ड! आपले चित्त ढळू न देणारा. टाईम मशीनचे वेड घेऊन.. खरेतर खूळ घेऊन.. बसलेला. त्याला म्हणालो मी.. "गड्या हे टाईम मशीन एक कल्पना आहे नुसती. कवी कल्पना म्हणतो मी तिला.. त्या कल्पना कशा कसल्याही असू शकतात.. आगा न पिछा असलेल्या.. तसे या टाईम मशीनबद्दलही वाटते मला."

यावर तो हसला.. म्हणाला.. "कवी कल्पना म्हण की अजून काही.. मी लवकरच बनवतो की नाही बघ ते मशीन..!"

मध्ये काही दिवस गेले. मी त्याच्या प्रगतीकडे लक्ष ठेवून होतो. हिमतीचा नि हिकमती खरा तो.. रात्रंदिवस जागायचा कधी कधी! जेवणाखाण्याची शुद्ध नसायची. कसले कसले

साहित्य घेऊन बसायचा.. गहन आकडेमोड करत. त्या काळात त्याने दोन फोटो काढून टांगले आपल्या टेबलासमोर.. एक न्यूटनचा आणि दुसरा आईनस्टाईनचा. म्हणाला, "एकलव्यासारखा शिकेन मी.. टाईममशीन बनवीनच.."

अभ्यासात नसेल रमला कधी इतका दंगला होता तो. मी माझा टाईमपास करीत बसायचो. आणि वेळ मिळेल तशा आणि तितक्या झोपा काढायचो. माझा त्याला तसाही काही उपयोग नव्हताच.. एक गप्पा मारणे सोडले तर. त्याला विरंगुळा तेवढाच.

आणि तो दिवस उगवला..

मी झोपलेलो नेहमीप्रमाणे. हा आला नि म्हणाला, "उठ.."

मी ढाराढूर.. डोळे किलकिले केले.. तो पुढे म्हणाला,

"उठ.. आय हॅव डन इट!"

मला वाटले अजून एखादी लिहिली असेल याने गोष्ट. पण मला हाताने उठवत म्हणाला, "बन गया मेरा टाईम मशीन.."

मी कधीमधी कविता करायचो.. झाली की म्हणायचो.. "बन गई मेरी कविता!"  त्या चालीवर हा म्हणतोय.. टाईम मशीन बनलेय म्हणून?

आजवर मी गंमतीत घेत होतो सारे.. खरेच बनले ते मशीन?

नक्की हा प्रकार काय असावा? कधीतरी त्याने सांगितलेले टाईममशीन बद्दल पण मी ऐकेन तर ना? आणि ऐकूनही मला ते कळेल तर ना!

पण आता ते मशीन सत्यात आलेच होते. मला उठावेच लागले. काही झाले तरी जानी दोस्त तो माझा. त्याच्या एवढ्या मोठ्या यशाचा अभिमान वाटलाच पाहिजेना मला. समोर काही मशीन दिसत होते. गोल गोल. त्यात मध्यभागी बसायला जागा. समोर असंख्य बटणे. अधूनमधून चमकणारे लाल नि हिरवे दिवे.

"बॅटरीवर चालेल हे?"

मी बावळटासारखा विचारला प्रश्न..

पण गंभीरतेने तो म्हणाला, "यस.. सोलार बॅटरी.. एक पॅनेल आहे ते सौरशक्तीवर चार्ज होईल. आणि त्यात मी त्याला स्वतःहून चार्जिंग होत राहिल अशी सोय केलीय.. गाडीची बॅटरी कशी होते तशी.."

"मग काय आता या मशीनीतून कुठे?"

"कुठे काय..? भूत नाहीतर भविष्यात.. मला तरी भूत काळात जायला आवडेल.."

"वा! ग्रेट! पण परत कधी येशील?"

"चांगला प्रश्न विचारलास.." एखाद्या मुलाखतीत बोलावे तसा तो म्हणाला.. "माझा फॉर्म्युला सोपा आहे.."

फॉर्म्युला म्हटले की माझी दांडी गुल होते.. कुठलेही गणितातील समीकरण म्हटले की मी माझ्या मनाला त्रास करून घेत नाही.. उगाच चुकले उत्तर म्हणून हळहळ कशाला वाटून घ्या. आणि दिवे लावायचे तर ते मी दहावीतच नसते लावले?

तरी तो पुढे म्हणालाच, "तू किती दूर जाशील यावर ते अवलंबून आहे.. म्हणजे दोन वर्षांपूर्वीच्या काळात गेलास तर काही मिनिटांत परत.. दोन हजार वर्षांपूर्वीच्या काळात गेलास तर.. हिशेब करून सांगतो.. सतरा दिवस.. साधारणपणे!"

"बाप रे! एवढा वेळ.. ?"

"लागणारच ना.. एका वर्षाला दहा कोटीने भाग द्यायचा.. हे माझ्या ह्या मशीनचे स्टॅंडर्डायझेशन आहे.."

एका की दहा कोटीने कसला भाग देतोय  मी.. कोटीचे आकडे वाचून मीच भागणार होतो तिकडून! असेल त्याचे काही कॅलक्युलेशन..

"उद्या मी ट्रायल घेणार.. मशीनमधून जाणार .. भूतकाळ! ही पहा बटणे.. आकडा दाबलास की तात्काळ त्या काळात!"

"वा! ट्रायल घेऊन टाकू.."

"तू नव्हे.. मीच जाणार. आणि तू उद्घाटन कर हे बटन दाबून.. उद्या! इथे किती वर्षे मागे किंवा पुढे जायचे त्याचा आकडा दाबायचा .. त्यात अधिक किंवा उणेची खूण केली की तितकी वर्षे पुढे किंवा मागे.. आहे की नाही सोपे?"

हुं.. सोपे तर होतेच!

रात्रभर मी जागाच होतो. माझ्या डोळ्यांसमोर आमच्या मैत्रीतले दिवस येत होते. त्याची दिनरात मेहनत.. आणि त्या

विज्ञानकथा! हल्ली मी नारळीकर वाचून संपवलेले.. लोंढ्यांची पुस्तके आवडायला लागलेली.. कुण्या रशियन लेखकाची अनुवादित पण मिळाली मला. टाईम मशीन सगळ्यांचाच आवडता विषय. याशिवायही काय काय लिहितात हे ग्रेट लोक. त्यामुळे एखादी वैज्ञानिक काल्पनिक गोष्ट सत्यात येताना बघण्याची मला उत्कंठा होती. त्यातील काहीही कळले नाही तरी. रात्री मी त्याच्या त्या चंद्रावरच्या गोष्टीचा विचार करत होतो.. न जाणो हे ही सत्यात येईल एक दिवस. आणि ते येवो न येवो.. त्या  त्या गोष्टीसाठी बक्षीस मिळेलच इतकी सुंदर जमलीय ती. अजून काही विचार करता करता माझा सकाळी डोळा लागला असावा परत.

कारण मी उठलो तेव्हा तो नव्हता. त्याचे ते मशीन नव्हते. मी डोळे चोळून आठवले.. आणि डोळ्यापुढे लख्ख दिसले..

तो जायला निघालाय.. म्हणाला, "दोन हजार वर्षांपूर्वीच्या काळात सोड मला." मी उद्घाटनाचे बटन दाबताना त्याला अंगठा दाखवला.. "ब्राव्हो माय फ्रेंड" म्हणालो.. काळाचे बटण दाबले.. उणे..

पुढे काही सांगण्याआधी हे सांगायला हवे.. मी रात्रीतून इंटरनेट वरून ज्यूरासिक पीरियडची माहिती काढलेली. वीस कोटी वर्षे.. डायनोसॉर तेव्हा राज्य करीत होते.. 'मेसोझुइक' का असा काही त्या कालखंडाचा उल्लेख होता. माझ्या डोक्यात त्यातले शिरले थोडेफार.. त्या मुळे त्यातील तो कालखंड चुकीचा असू शकतो. वीस कोटी वर्षे! मी मनातल्या मनात नोंद केलेली.. एवढा आकडा लक्षात ठेवलेला मी! दोनावर आठ शून्ये!

मग काळाचे बटण दाबताना मी दोन हजारावर पाच शून्ये अधिक दाबली तेव्हा ती चूक म्हणावी की मी मुद्दाम केले म्हणावे? तो निघून गेला. प्रयोग चांगलाच यशस्वी झालाय. बाकी माझे गणित कितीही कच्चे असो.. हा हिशेब चुकायचा नाही.. आणि आता तो परत येईल.. दोन कोटी वर्षांपूर्वीच्या काळात गेलाय.. तर येईल तोवर दोन वर्षे उलटतील! हिशेब सोप्पा आहे.. दहा कोटींनी भागायचे!

मी कामाला लागलो. त्याची ती पुस्तके आवरून ठेवून दिली. त्याचा पसारा सगळा ठेवून दिला बाजूला.  आणि महत्त्वाचे.. त्याची ती सुंदर विज्ञानकथा.. शोधून काढली नि पाठवण्यासाठी तयारीस लागलो. म्हणजे पाकिटात वगैरे घातली. फक्त एक बदल करून.. लेखक म्हणून माझे नाव घालून. मला खात्री आहे हे पाच हजाराचे बक्षीस माझेच!

दोनेक महिन्यांतच निकाल आला.. आणि अर्थातच पहिल्या पारितोषिकाचा मान मलाच मिळाला. गोष्ट होतीच माझी तशी छान! माझे लेखक बनण्याचे स्वप्न पुरे झाले.. अजून त्याला येण्यास कितीतरी महिने बाकी आहेत. येईल.. वेळ काय पटकन निघून जातो.

*****

कुठल्यातरी अशाच गोष्टीत वाचलेले आठवले मला.. झोपेच्या काही स्टेजेस असतात म्हणे. त्यातल्या कुठल्यातरी एका स्टेजमधली स्वप्ने जागेपणी लक्षात राहतात म्हणे.

तसेच झाले!

त्या स्वप्नातून जागा झालो तो दरदरून घाम फुटलेला. एका कथेच्या बक्षिसासाठी इतके काही? अगदी टाईममशीन बनवून मी माझ्याच जानी मित्रास नाहीसे करावे? मी असेन आळशी .. पण असा खुनशी स्वभाव ही माझ्यात आहे? माझी मलाच लाज वाटली.. ते स्वप्नच आहे म्हणून मी निश्वास सोडला. डोळे उघडून पाहिले बाजूला तर तो टाईम मशीनशी झटापट करत होता बाजूलाच..

त्याला म्हणालो, "काय बनतेय ना मशीन? बनेलच.. पण तुझ्या मशीनचे उद्घाटन मी नाही करणार.."

तो माझ्याकडे एखाद्या वेड्या माणसाकडे पहावे तसा पाहात राहिला!

स्वप्नात काय झाले सांगायची हिंमत मला तरी नव्हती!

# *बळी तो कान पिळी*

नामदार अप्पाजी घोरपडे आज खुशीत होते.. इतक्या महिन्यांत पहिल्यांदाच.

अप्पाजी घोरपडे म्हणजे केंद्रिय मनुष्यबळ विकास म्हणजेच एच.आर.डी. मिनिस्टर, गव्हर्मेंट ऑफ इंडिया. ते आणि त्यांचा उजवा हात म्हणजे तात्या गायकवाड. दो हंसोंका जोडा म्हणून प्रसिद्ध आहेत दोघे. राजकारणात कोणी कुणाचा मित्र नसतो म्हणण्याला एक अपवाद. तात्या अप्पाजींचे निरपेक्ष मित्र. अगदी अप्पाजींच्या पडत्या काळातही कधी साथ सोडली नव्हती त्यांनी. अप्पाजी खूश झाले तसे तात्या म्हणाले, "मी म्हटले होते अप्पा तुला. अरे धीर धरावा लागतो. आज लावा झाड तर फळ  यायला दोन तीन वर्ष लागणारच की नाही? धीर धरा.. धीरापोटी फळे रसाळ गोमटी.."

"तात्या, तू म्हणतोस ते खरेच. धीर धरावा .. आणि रसाळ फळे चाखावीत.. आता आलीय ती वेळ.

तात्या काहीही म्हण, विज्ञान आणि तंत्रज्ञानाशिवाय तरणोपाय नाही. आणि एच.आर.डी.मध्ये बसून विज्ञानाची धरलेली कासच आम्हाला पुढे घेऊन जाईल.. तू म्हणाला होतास ते खरेच झाले तात्या."

गेल्या निवडणूकीत तात्या चांगले सव्वा चार लाखांहून जास्त मतांनी निवडून आले. निवडणुकीच्याच भाषेत सांगायचे तर त्यांचे निकटतम प्रतिद्वंदी.. त्याचेही डिपाॅझिट जप्त झालेले. अप्पाजींची लोकप्रियता पाहून त्यांना कॅबिनेटमध्ये घेणे भाग पडले पक्षश्रेष्ठींना. अप्पाजी आधीच्या मंत्रीमंडळात राज्यमंत्री होते. ते आता कॅबिनेट मंत्री झाले. पण खातेवाटपाच्या वेळी गोंधळ झालाच. त्यांना हवे होते ते रेव्हेन्यू खाते. पण श्रेष्ठींनी दोनच पर्याय दिलेले .. एच. आर. डी. नाहीतर क्रीडामंत्रीपद. रेव्हेन्यूमध्ये संधी खूप, पण क्रीडाखात्यात कसले खेळ खेळणार? पण तात्यांनी समजावले तेव्हा अप्पाजींना. संयम आणि सबुरीचा मंत्र. एच. आर. डी. पदरात पाडून घ्या. उद्या पाहू काय होतेय ते.. तात्यांचा सल्ला.. आज तो फळाला येताना दिसतोय.

अप्पाजी मंत्री झाले. मंत्रीपदाबरोबर उद्घाटने आली.

समारंभ आले. वेगवेगळ्या व्यासपीठांवरून भाषणे ठोकणे आले. अप्पाजी त्यात हुशार होते. म्हणजे विषय कोणताही असो, माईकचे बोंडूक समोर आले की यांची गाडी सुरू. स्वत:ला विषय समजो न समजो, समोरच्या मोठमोठया शास्त्रज्ञांना चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्याशिवाय सोडत नसत अप्पाजी. केंद्रातले मंत्री ते, त्यांना कोण अडवणार? सगळे ऐकून घेत. त्यात एके दिवशी एका शास्त्रीय संमेलनाचे उद्घाटन मंत्रीमहोदय अप्पाजींच्या हस्ते झाले. नेहमीप्रमाणे अप्पाजींनी सभा गाजवली. त्यांची माणसं गर्दीत पेरून ठेवलेली, कोठे टाळ्या वाजवायच्या ह्याची सक्त ताकीद तात्या त्यांना आधी देऊन ठेवत. त्यांची माणसं आता सरावाने चुकत नसत. तशीच यावेळीही चुकली नाहीत. अप्पाजींनंतर प्रसिद्ध संशोधक डॉ. जलील अन्सारी बोलले. विषय होता 'डार्विनचा सिद्धांत आणि आपण' अप्पाजींनी मन लावून भाषण ऐकले असावे, कारण सरते शेवटी निष्कर्ष काढायचा तो काढलाच..

परतल्यावर तात्यांना म्हणाले,

"चांगला बोलला नाही अन्सारी. हुशार आहे."

"असणारच. एवढा मोठा शास्त्रज्ञ."

"असेल. पण मी तुला सांगितले तेच याने शास्त्रीय भाषेत सांगितले .. लक्षात आले तुझ्या?"

"काय?"

"अरे अन्सारी काय म्हणाला? ते इंग्रजीत.. सर्व्हायव्हल ऑफ फिटेस्ट.. म्हणजे आपण म्हणतो तेच.."

"काय?"

"तात्या, तू तातोजी आहेस रे.. साध्या भाषेत याचा अर्थ आहे, बळी तो कान पिळी .. ज्याच्या अंगी ताकद तोच देईल सर्वांना ताकीद .. समजले?"

"असेल. पण डार्विन कशाला हवा त्यासाठी .. अप्पाजींचा सिद्धांत पण हाच आहे की नाही?"

"अर्थात. सर्व्हायव्हल ऑफ फिटेस्ट आणि स्ट्रॉंगेस्ट.. म्हणून मी म्हणतो, बलवान व्हा, ताकद कमवा .."

"म्हणजे व्यायामाला लागा .."

"नाही तात्या .. राजकीय ताकद. म्हणजे काय आणि कायकाय ते मी सांगायला नकोच. पैसा हवा, लोकसंग्रह हवा.. शक्तिमान, बलवान, धनवान, विद्वान सर्वांचा पाठिंबा हवा.. हे मिळवण्यासाठी मुळात ताकद हवी.. ताकदीने ताकद अजून वाढते .."

"अप्पा, तुझ्याकडे यातले काय कमी आहे रे?"

"काय कमी? तसे नाही तात्या, ताकद असती तर गृहमंत्री झालो नसतो..? आणि एक दिवस पंतप्रधान पदाची खुर्ची मिळवण्याच्या रांगेत असतो. झालो काय? मनुष्यबळ विकास मंत्री. म्हणजे नाव भले असू देत मनुष्यबळ विकास पण ताकद अजून कमावणे आहे.. तात्या, अजून जोरात कामाला लागणे आले.. तात्या विचार कर अजून काय करता येईल.. विचार कर.."

या गोष्टीला सहा महिने उलटून गेले. अप्पाजी नि तात्या राजकारणातले कसलेले गडी. त्यांची ताकद वाढणारच होती, तशी वाढत होती. अप्पाजी

मात्र समाधानी नव्हते. ताकद वाढवण्याचा जादूचा फा़ॅर्म्युला हवा होता त्यांना.

लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचे महत्त्व जाणून

तात्यांकडे अप्पाजींनी दिवसातले सारे मराठी आणि इंग्रजी पेपर वाचण्याचे काम दिलेले. त्यात तात्यांना एक दिवस डॉ.अन्सारींचा लेख हाती लागला. 'माणसाच्या प्रगतीत विचारांचे महत्त्व.'

माणूस विचार करतो म्हणजे काय करतो.. मेंदूतील वेगवेगळे विभाग कसे जोडले जातात आणि त्यातून माणसाच्या विचारांचा ओघ निर्माण होतो. त्यात माणसाच्या विचारांवर माणसाचे सारे आयुष्य कसे आकार घेते, आणि आयुष्यातील अनुभवांवर विचार करणे कसे अवलंबून असते, विचार आणि आचारांची सांगड घालण्याचा देखील विचार कसा येतो माणसाच्या मेंदूत याचे शास्त्रीय विवेचन होते. सारे वाचून झाल्यावर शेवटची वाक्ये तात्यांनी अधोरेखित करून अप्पाजींकडे पेपर दिला .. त्यात लिहिलेले होते ..

'विचार ही बदलांची गंगोत्री आहे. माणसाच्या मनाचा थांग लागणे मुश्किल जरूर आहे पण अशक्य नाही. शास्त्राने केलेल्या प्रगतीच्या जोरावर मनुष्याचे विचार समोरील

माणसास वाचता येऊ शकतील असे संशोधन आम्ही करत आहोत. एकूणच देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने या नवीन संशोधनाचा उपयोग होऊ शकतो. लवकरच आम्ही हे तंत्रज्ञान देशाला अर्पण करू.'

अप्पाजींनी वाचून पेपर बाजूला ठेवला. हीच ती जादूची किल्ली. ह्याचीच जणू ते वाट पाहात होते.

डोक्यात त्यांच्या समोरच्या व्यक्तीच्या डोक्यातले विचार कसे जाणून घ्यावे याचेच विचार घोळत होते..

समोरच्याच्या खेळीची माहिती आधीच मिळाली तर राजकारणात मागे वळून पहावेच लागणार नाही .. राजकारण म्हणजे बुद्धीबळ. बुद्धीचे बळ वाढण्यास वेळ लागू शकतो, पण समोरील माणसाच्या सोंगटीची चाल कळली जर आधीच तर.. त्यावर मात करणे सोपे.. अप्पाजी आपल्या कार्यालयातून बाहेर पडले.. आपल्या गाडीतून निघाले तेव्हा पाहिले त्यांनी.. पंतप्रधान कार्यालयातून डॉ. जलील अन्सारी बाहेर पडत होते..

अप्पाजींनी तात्यांना आतल्या खोलीत बोलावून घेतले. खूप वेळ त्यांची गुप्त खलबते सुरू राहिली. "डॉ. अन्सारी! तात्या, नक्कीच त्याला शोध लागला आहे."

"कशावरून?"

"त्याशिवाय तो आला इकडे?"

"अप्पा.. आपण शोध घेऊयात.. त्याला शोध लागला आहे की नाही याचा!"

"आणि माणूस कसा आहे याचा ही.."

"म्हणजे?"

"त वरून ताकभात तात्या. साम दाम दंड भेद.. कशाने नमणारा आहे ते शोधा. त्याप्रमाणे आपली कृती झाली पाहिजे .. एकदा का हे तंत्रज्ञान हाती आले की बघशील तात्या .. तू.."

"हुं.. बघूयात. लावतो कामाला माणसं.. आपण आपल्या मिनिस्ट्रीतून एक वर्कशॉप ठेवले तर.. डॉ. अन्सारी मुख्य पाहुणा. देऊ त्याला भाव.."

"आणि त्याने ती यंत्रणा आधीच सुरू केली असेल.. आपल्यावरच वापरली तर?"

"हे खरंय अप्पाजी .."

"तर जे काही करायचे ते लवकरात लवकर. अगदी रॅपिड ॲक्शन फोर्स.. या कानाचे त्या कानाला कळू न देता. आणि महत्त्वाचे.. डायरेक्ट संपर्क.. डॉ. अन्सारीशी टाळा. जोवर नक्की माहिती मिळत नाही. मग अन्सारीशी मी डील करेन स्वतः .. जे काही असेल ते.. पैसा अशावेळी कामी नाही येणार तर कधी येणार ..? पैशाला न भुलणारा माणूस अजून या अप्पाजीने पाहिला नाहीये."

यंत्रणा सरकारी असली तरी तिच्या कामाचा वेग ठरवला जातो तो ती चालवणाऱ्यांकडून. त्यामुळे त्यांना हवी तेव्हा ती यंत्रणा वायुवेगाने चालू शकते. राजकारण्यांच्या महत्वाकांक्षेचा वारू जितक्या वेगात उधळेल तितक्या वेगाने ही यंत्रणा ही सुरू होते. त्यामुळे अप्पाजींना सगळी माहिती मिळण्यास वेळ

लागला नाही. समोरच्याच्या मनात येणारे नेमके विचार शोधणारी एक यंत्रणा डॉ.अन्सारीने नव्याने घडवलेली. शास्त्रज्ञच तो. त्यात जगभर नावाजलेला माणूस. कित्येक नवनवीन शोधांचा जनक म्हणून नाव आहे अन्सारीचे. हा

लेटेस्ट शोध. त्या नव्या मशीनची काम करण्याची पद्धत कशी आहे यात अप्पाजींना रस नव्हता, पण ती यंत्रणा राबवून राजकारणाच्या शिड्या धडाधड चढण्यात मात्र होता. एकावेळी एक जिना न चढता डायरेक्ट उड्या मारणे आणि आपल्या ध्येयापर्यंत पोहोचणे.. या साठी अर्थातच कोणत्याही थरास जाण्यास अप्पाजी तयार होते.. शेवटी बळी तोच कान पिळी.

आज अप्पाजी खूश होण्यास कारणही तसेच होते..

आणि आज अन्सारी त्यांच्या समोर होता.. आपले बळ वाढवण्याची किल्ली त्यांना सापडलेली..

सगळी माहिती त्याच्याबद्दल काढून झाल्यावर अप्पाजींचा नाईलाज झालेला. आज अन्सारीला त्यांच्या माणसांनी पकडून आणलेले. कुणाच्याही नकळत. अपहरण करून. अन्सारी समोर बसलेला आणि अप्पाजी त्याच्याशी बोललेही. आजच्या युगात माणसाने किती मूर्ख असावे याचा नमुना म्हणजे डॉक्टर अन्सारी. त्या यंत्रणेची सर्व माहिती आणि अधिकार हव्या तितक्या किंमतीत विकत घ्यायला अप्पाजी

तयार होते. पण अन्सारीला पैशांची किंमत नाही. पण स्वतः जिवाचीही नसावी? अप्पाजींचा हिंसेवर विश्वास नाही. जी गोष्ट सामोपचाराने साधता येते त्यासाठी हिंसा कशाला? अगदीच नाईलाज झाला तर शेवटचा पर्याय म्हणून हिंसा करावी लागते. अप्पाजी म्हणतात.. महाभारताचा आदर्श डोळयांपुढे ठेवून चाललो आयुष्यभर .. कर्म महत्वाचे म्हणत.

साम दामाची भाषा समजण्यासाठी असणारी अक्कल अन्सारीत डेव्हलपच झालेली नाही.. अप्पाजींचे मत झाले. अन्सारी गोडीगुलाबीने ते नवे सॉफ्टवेयर नि ते डिव्हाईस देणार नाही एवढे लक्षात आले नि अप्पाजींचा नूर बदलला. एवढा मोठा शास्त्रज्ञ असा निघावा? ज्याला पैशाची किंमत कळत नाही त्याला अजून काय कळत असेल? पण शेवटी सारे काही हाती आलेच अप्पाजींच्या.. शस्त्राच्या बळावर शास्त्र..

बंदुकीच्या नळीच्या धाकावर कित्येक जणांनी इतिहास रचला, बनवला नि बदलला. इतिहासात इतके आदर्श असताना सरकारातील अप्पाजी घोरपडे कसे काय मागे हटतील? हवे ते मिळवणे हा त्यांच्या स्वभावाचा भाग. हट्टीपणा

म्हणा किंवा जिद्द म्हणा .. हवे ते त्यांनी मिळवलेच. आता ती यंत्रणा वापरून अप्पाजी राजकारणात पुढेच जातील.. डॉक्टर अन्सारी सारखे कुणी येईल नि जाईल ..

दोन दिवसांनी मोठी बातमी आली, 'प्रसिद्ध संशोधक डॉ. जलील अन्सारी बेपत्ता. त्यांच्या निवासस्थानातून त्यांचे अपहरण झाल्याचा गृहखात्याचा संशय. तर त्याचवेळी मनुष्यबळ विकास मंत्र्यांनी त्यांचा परकीय देशांशी संबंध असल्याचा संशय व्यक्त केल्याने दिल्लीत आज एकच खळबळ उडाली. डॉ. अन्सारी एक प्रसिद्ध शास्त्रज्ञ होते. त्यांच्या बेपत्ता होण्यामागे ज्या कोणाचा हात असेल त्यांना शोधून काढण्यास सरकार मागेपुढे पाहणार नाही असेही मनुष्यबळमंत्री श्री. अप्पाजी घोरपडे यांनी पत्रकारांना सांगितले. गृहखात्याचे मंत्री श्री. जितेन्द्र सिंग यांनी पुढील तपास चालू असून लवकरच या प्रकरणाचा छडा लागेल असे आश्वासन पत्रकारांशी बोलताना दिले.'

अप्पाजींच्या भात्यात आता नवीन अस्त्र आलेले. नवीन बळाच्या आधारावर दिसेल त्या विरोधकाचे कान पिळण्यास ते तयार होते आता. अप्पाजींचा घोडा उधळायला लागला. सगळीकडे आपल्या महत्वाकांक्षेच्या वारूवर आरूढ होऊन अप्पाजी तात्यांबरोबर सुसाट सुटले. वाटाघाटीत अप्पाजींचा हात धरणारा कुणीही नव्हता. आता तर समोरच्या व्यक्तीच्या मनातले कळायला लागल्यावर त्यांच्या घोडदौडीला लगाम घालणारा कुणीच राहिला नाही. डॉ.जलील अन्सारींचा पत्ता तर कुणालाच लागणार नाही याची व्यवस्था तर करून ठेवलेली त्यांनी पण त्याही पुढे जाऊन त्यांच्या अपहरणावरून रान उठवले. शेजारील शत्रूच्या पुढे आपण कमजोर पडत आहोत आणि दिवसाढवळ्या अपहरण होत असेल तर गृहमंत्री म्हणून जितेंद्रसिंग यांचा राजीनामा घ्यायला हवा याची मागणी आपोआपच यायला लागली मिडियातून. अप्पाजी आपले पत्ते तर नीट खेळत होतेच. आता पुढे सगळे मोकळे रान होते..

तीनच महिन्यांत श्री. अप्पाजी घोरपडेंनी गृहखात्याची सूत्रे जितेंद्रसिंग यांच्याकडून हाती घेतली. परकीय शक्तींनीच डॉ.

अन्सारींचे अपहरण केले असून अशा गंभीर परिस्थितीत गृहखात्यात अशा कणखर व्यक्तीचीच गरज असल्याचे खुद्द पंतप्रधानांनी वृत्तपत्रांना मुलाखतीत सांगितले .. आणि दिल्लीच्या मदतीस महाराष्ट्र धावून गेल्याच्या बातम्या सगळ्या मराठी वृत्तपत्रांनी दिल्या ..

## स्वप्नांच्या पलिकडले..

उदय आला तेव्हा मी कसाबसा जागा झालो.

"काय उगाच मेकिंग डेसिकेटेड कोकोनट ऑफ स्लीप.."

अर्धवट झोपेतही मला असले इंग्रजी सुचते. खोबरे म्हणजे डेसिकेटेड कोकोनट!

"अरे वाजलेत किती ते पहा.."

'काय सहा वाजले? सूर्या, एवढ्या भल्या पहाटे कशाला उगवलास?"

"मी उदय असलो तरी तो तसा उदय नाही झालाय माझा. आणि सहा नाही .. दहा. उठ आणि कामाला लाग .."

"झोपू देत रे. काल रात्रभर जागा होतो मी.. आणि मला वाटते आय हॅव गा◌ॅट द सोल्यूशन .."

'सोल्यूशन? कशाचे?"

"कशाचे असते सोल्यूशन?"

"सॉल्ट प्लस वा ॅटर? नाहीतर साखर आणि पाणी?"

"तसले नाही .. माझ्या प्रा ॅब्लेमचे उत्तर मिळाले .."

"ओह! विश्वाची उत्पत्ती कशी झाली याचे उत्तर सापडलेले दिसतेय.."

'वा! तुला कसे कळले?'

"पण त्या उत्पत्तीपेक्षा चहा पत्ती जास्त महत्त्वाची आहे..'

"संपली आहे.. रात्री तीन कप चहा प्यालो मी.. त्यात संपली .."

उदय म्हणजे माझा रूम पार्टनर. मी तसा शास्त्रज्ञ नाही ना ही गणितज्ञ. पण असे मोठमोठे प्रश्न मला पडतात नि त्याची उत्तरे मला मिळाल्यासारखी वाटतात. बहुतेकदा ती पहाटे झोपेतून पडलेल्या स्वप्नात दिसत असतात मला. सकाळी उठले की लक्षात येते, हे उत्तर नाहीच म्हणून! किंवा स्वप्नात मिळालेले उत्तर माझ्या कितीही प्रयत्नानंतर लक्षातच नाही म्हणून. तरी माझे प्रयत्न काही सोडलेले नाहीत मी. नाही म्हणता म्हणता एखाद्या गूढ प्रश्नाचे उत्तर मिळून ही जायचे मला. न्यूटनला कसे सफरचंद पडता पडता मिळाले उत्तर तसे. थोडक्यात तो आयझॅक न्यूटन असेल तर मी एकझॅक्ट न्यूटन

बनू शकेन कधीतरी. अर्थात ही एक गंमत म्हणून, नाहीतर शास्त्र आणि माझे तसे फार काही सख्य नाही. पण प्रश्न मात्र सतत पडत असतात मला. त्यांची उत्तरे शोधत असतो मी सगळीकडे. ही विश्वाची उत्पत्ती हा त्यातील लेटेस्ट प्रश्न.

म्हणजे झाले काय की त्या दिवशी मी आणि उदय दोघेही बसलो होतो बोलत. मी, त्याच्या म्हणण्यानुसार, माझ्या अकलेचे तारे तोडत होतो. त्यात उदय म्हणाला, "कोणत्या देवाने घडवले तुला कोणास ठाऊक!"

मी म्हणालो, "जसा मानव तितुका एकच आहे.. तसा भगवान सर्व एकच आहे म्हण. त्यामुळे जिस भगवान ने बनाया इस फूल और पत्तोंको.. फूल म्हणजे इंग्रजीतील नाही.. आणि ते तुला उद्देशून नाही .. जिस भगवान ने बनाया इस चिडिया और कौवे को.. किंवा इस उदय को .. उसीने बनाया है मुझको. म्हणजे बघ ना, कशी झाली असेल या विश्वाची उत्पत्ती?"

अशी ठिणगी पडली आणि माझ्या मनात प्रश्न घोळू लागला.. या समग्र विश्वाचा उगम का आणि कसा झाला असेल? याची उत्तरे शोधू लागलो मी. पुस्तके धुंडाळतोय.. दिनरात्र विचार करतोय..

माझे हे असेच आहे. प्रश्न पडतात, ते पाठलाग सोडत नाहीत, जोवर दुसरा कुठला प्रश्न पडत नाही मला. पहिल्याचे उत्तर मिळतेच असे नाही, पण बहुधा मिळाल्यासारखे वाटते मला. कित्येकदा एकाचवेळी अनेक प्रश्नही पडत असतात मलस. माझ्या प्रश्नांची नक्की उत्तरे मिळण्याचे एकच ठिकाण असते, ते म्हणजे मला पडणारी स्वप्ने. स्वप्नात सगळे काही सोपे सरळ होऊन जाते. प्रश्न सुटतात. गुंता उलगडत  जातो. समाधानाने मी उठतो.. पुढील प्रश्नाकडे वळण्यासाठी आणि लक्षात येते मला, स्वप्नात उत्तर मिळालेय खरे.. पण ते उत्तर खरे तर मला आठवतच नाही अजिबात. पण एक फक्त फिलिंग राहते, प्रश्न सुटल्याचे. असे कित्येक प्रश्न सोडवलेत मी. फक्त त्यांचा माझ्याकडे रेकॉर्ड मात्र नाही.

विचार करा, गहन अशा प्रश्नांची उत्तरे या वयात मी दिली तर ॲरिस्टा ॅटल नि प्लेटो वगैरेंच्या पंक्तीत नाही का बसणाऱ्या मी? आणि मग कदाचित काही वर्षांनी एखाद्या इतिहासाच्या पुस्तकात माझा विचारवंताच्या पोझ मध्ये फोटो दिसेल ..

यावर विचार करता करता माझ्या लक्षात आले ते हे.. सगळ्या प्रश्नांची उत्तरे माझ्याकडे आहेत.. पण ती मिळवायची तर मला हमखास उत्तरे देणारी माझी स्वप्ने मला लक्षात ठेवावी लागतील. माणसाला स्वप्ने का पडत असावीत? मनी वसे ते स्वप्नी दिसे इतके सोपे असेल हे? माणसाला स्वप्ने का पडत असावीत याचेही उत्तर मला स्वप्नातच मिळेल? मिळाले तरी ध्यानात राहिल माझ्या? विश्वाची उत्पत्ती मागे सोडून मी आता स्वप्नांच्या मागे लागलो.

***

डॉ. अतुल तुकाराम अवसरे. स्वप्न तज्ञ आणि स्वप्न सल्लागार. शास्त्र किती प्रगत झालेय नाही? स्वप्न सल्लागार पण एक स्पेशालिटी झालीय. मी डॉक्टरांच्या समोर बसलो होतो..

डॉक्टर अवसरे तसे तरूण होते. बिझी असतील बहुधा. कारण केस अस्त्यावस्त होते त्यांचे. ते कापण्यास अवसर नसावा मिळत कदाचित.

"हॅलो डॉक्टर. मी श्रीकृष्ण सदानंद पेडणेकर."

"बोला, नक्की काय प्राॅब्लेम आहे?"

"काय आहे ना डॉक्टर, मला स्वप्ने पडतात. स्वप्नात कित्येक जटिल समस्यांची सोल्यूशन्स मिळतात .."

"दॅट्स ग्रेट. मग प्राॅब्लेम कुठे आहे?"

"पण उठल्यावर सारे काही विसरून जायला होते .."

'मग?'

"मुळात अशी स्वप्ने पडावीतच का? पडत असल्यास त्यांचा फायदा काय? नि विसरून गेल्यास तर काहीच उपयोग नाही .."

"थांबा.. स्वप्ने माणसाला का पडतात? झोपेच्या पाच स्टेजेस असतात. आपल्याला झोपेत कळत नाहीत .."

"अर्थातच. झोपेत कसे कळणार?" मी उगाच मध्ये बोललो. त्याकडे दुर्लक्ष करत डॉक्टर म्हणाले,

"तर झोपेतली पाचवी स्टेज असते, त्यात डोळ्यांची जलद गतीने हालचाल होत असते.. त्यावेळी मेंदू जलद काम करत असतो .. अशा वेळी आपल्याला स्वप्ने पडत असतात. मग काही सेकंदात डोळे उघडले तरच ती लक्षात राहतात, नाही तर

विसरली जातात. एका रात्रीत अशी कित्येक स्वप्ने पडत असतात .."

"म्हणजे मेंदू तेव्हा ॲक्टिव्ह असतो?"

"ॲक्च्युअली यस. स्वप्नांबद्दल आपल्याला आता खूप काही माहिती झाले आहे, तरी अजून खूप माहिती होणे बाकी आहे.."

"पण माझ्या स्वप्नांबद्दल? त्यांचे काय करू? मला तर वाटते जगातील कित्येक प्रश्नांची उत्तरे मला मिळतील ती स्वप्ने लक्षात राहिली तर.."

'फाॅर एक्झांपल?"

"नुकताच मी विश्वाच्या निर्माणाबद्दल विचार करत होतो. आणि मला वाटतेय मला उत्तर मिळाले त्याचे स्वप्नात."

"छान. मग सांगून टाका.."

"तोच तर प्राॅब्लेम आहे ना सर. उठल्यावर विसरतो मी. अशी उत्तरे मिळू शकतात?"

"फा ॅर अ मोमेंट धरून चालू.. अर्थातच मिळू शकतात .. म्हणजे उत्तरे तुम्हाला किती नि कशी मिळतील ते तुमच्या स्वत:च्या स्वप्नांवर अवलंबून आहे.."

"आणि प्रश्नांवर सुद्धा डॉक्टर?"

"अर्थात. कोणते प्रश्न पाडून घ्यायचे हे ही तुमच्यावरच अवलंबून आहे.. नाही का?"

"पण मग माझी स्वप्ने? आणि सर, माझे स्वप्न आहे.. एखादा गहन नि कूट प्रश्न सोडवला आहे मी.. मग तत्ववेत्ता वा तत्वचितंक म्हणून मी ओळखला जाईन. आयॅम शुअर, माय ड्रीम्स आर ऑफ दॅट वर्थ .."

"ओके. आपण ते आता प्रूव्ह किंवा डिसप्रूव्ह करू शकू.."

"म्हणजे ॲक्च्युअल पुरावा?"

खरेतर डॉक्टर बोलताना मध्ये मध्ये बोलणे चुकीचे पण माझी ती सवय आहे. कोणाच्याही बोलण्यात स्वल्पविराम टाकल्याशिवाय मला चैन पडत नाही. कदाचित डॉक्टरांना सवय असावी अशा पेशंट्सची. कारण सराईतपणे दुर्लक्ष करत ते पुढे बोलत राहिले ..

"नाऊ थिंग्स आर सिंपल अँड इझी .. आपण तुमची स्वप्ने रेकॉर्ड करूयात."

"रेकॉर्ड?"

"अगदी सीडी निघेल त्यांची. ती बघितली की तुमची तुम्हाला उत्तरे मिळतील."

"स्वप्नांची रेकॉर्ड?"

"यस्स यंग बॉय. धिज आर रिसेंट ॲडव्हान्सेस. माझ्याकडे मशीन आहे. त्यात वेगवेगळे इलेक्ट्रोड्स आहेत. ते रात्री लावून झोपायचे डोक्यावर आणि डोळयांवर माझ्या इन्ट्रक्शन्सनुसार. त्यातून मेंदूची ॲक्टिव्हिटी रेकॉर्ड होईल. पण ती ग्राफच्या रूपात असेल. मग आम्ही ती स्पेशल सॉफ्टवेअरनी ॲनालाईझ करू. त्यानंतर प्रोसेसर मधून ते सारे जाईल. त्याचे ॲक्च्युअल व्हिडिओ मध्ये रूपांतर होईल. ती सीडी मिळेल तुम्हाला. बघा ती आणि ठरवा.."

"पण एका दिवसात एकाच दिवसाची स्वप्ने दिसतील.. सॉरी, रात्रीची स्वप्ने दिसतील..?"

"अर्थातच. इलेक्ट्रोड्स लावल्यावरच रेकॉर्ड होईल. त्याशिवाय आता आम्ही प्रयत्न करत आहोत चीप बेस्ड

रेकॉर्डचा. म्हणजे त्या चिप्स आम्ही बसवून देऊ मग तुम्ही त्या जोडल्या तर डायरेक्ट तुम्हाला रेकॉर्ड मिळेल. पण ते तंत्रज्ञान अजून डेव्हलप होतेय. सध्या तुम्ही एक आठवडाभर रेकॉर्ड करा. नंतर सगळा डेटा प्रोसेस करून सीडीवर रेकॉर्ड करून बघता येईल."

"दॅट्स ग्रेट डॉक्टर."

"यानंतर तुम्ही ती रेकॉर्ड बघाल, तर त्याचे काही ॲनालिसिस असेल तर ते आपण त्यानंतर बघू.."

"ओके सर.'

"बाहेर आमचा टेक्निशिअन शिकवेल कसे इलेक्ट्रोड्स कनेक्ट करायचे ते. नीट शिकून घ्या. आणि कम बॅक आफ्टर अ वीक."

"यस सर.. पण इलेक्ट्रोड्स म्हटल्यावर शाॅकबिक नाही ना बसणार?"

"ऑफकोर्स नॉट. ते फक्त ॲक्टिव्हिटी रेकॉर्ड करणारे असतील. लावून बिनधास्त झोपा. आणि एक. या आठवडाभर दर तासातासात काय काय केलेत ते लिहून ठेवा. आणि कुठल्या विषयांवर विचार करता ते ही."

"यस्सर.. थ्यांक्स. आठवड्याने येतो मी."

ते छोटे छोटे इलेक्ट्रोड्स घेऊन मी रूमवर आलो. वायरलेस होते. बटण ऑन केले की ब्ल्यू टूथने कनेक्ट होऊन तिकडून इंटरनेटने डॉक्टरांकडे डायरेक्ट रेकॉर्ड. या आठवड्यात चांगली उपयोगी स्वप्ने पडली पाहिजेत नाहीतर परत हे रेकॉर्ड करत बसावे लागेल .. आता पडणाऱ्या स्वप्नांबद्दल विचार करायला हवा..

आठवड्याभरात परत डॉक्टरांकडे गेलो मी. त्यांनी दिलेली सीडी घेऊन परत आलो. माझ्या स्वप्नांची रेकॉर्ड बघायची मोठीच उत्सुकता लागली होती मला. दिवसवार आणि वेळेसकट व्हिडिओ रेकॉर्डिंग होते स्वप्नांचे. काय काय नव्हते त्यात? पहिल्याच रेकॉर्ड मध्ये मी बैलगाडीत बसून चाललो होतो. एके ठिकाणी स्पीडब्रेकरवर डोके आपटले माझे. दुसरीकडे मी मॅरॅथॉन धावून जिंकलो होतो.. एकात मी बसमध्ये सीटवरून भांडत होतो.. आणि एकात तर चक्क मी डॉक्टर नि अवसरे डॉक्टर पेशंट म्हणून समोर असे बसलेलो होतो! मी माझी डायरी उघडून पाहिली. दिवसभराच्या घटनांचा

नि स्वप्नांचा ताळमेळ काही बसत नव्हता. बुधवारी सकाळी उठलो तेव्हा एक मोठा प्रश्न .. बेडूक हिरवा असला तरी झाडाप्रमाणे अन्न का तयार करत नाही .. स्वप्नात सुटल्याचे लिहिलेले. पण रात्रीच्या स्वप्नात बेडकाचा पत्ताच नाही. तेच शुक्रवारी.. परग्राहावरून येणारे कुणी पृथ्वीवर दिसतील का खरोखर.. हा प्रश्न सुटल्याची नोंद डायरीत .. आणि रात्रीच्या स्वप्नात मी पाणबुडीने समुद्राच्या तळाशी जाऊन माशांशी खेळत होतो.. एका ऑक्टोपसाच्या आठ हातांशी मस्ती करत होतो! एकूण साधाही प्रश्न कुठलाच सुटलेला दिसत नव्हता या रेकॉर्डमध्ये तरी.. तर विश्वाच्या उत्पत्तीसारखे गहन नि गूढ प्रश्नांचे तर राहिलेच बाजूला.

ते काही असो, परत मी काही नवीन रेकॉर्ड नाही काढली. मला इंटरेस्ट गहन प्रश्न सोडवण्यात होता.

ते नाही सुटले, पण त्या निमित्ताने स्वप्नांची रेकॉर्ड निघते आणि ती आपण परत पाहू शकतो हे तरी कळले..

एकूण काय.. मी विचारवंत होणे कठीण आहे. कुठे तत्ववेत्ता म्हणून फोटो येणे पण अशक्य आहे. पण मी विचार करणे सोडले नाही अजून विविध प्रश्नांवर.. उत्तरे मिळाली की सांगेनच.. स्वप्नांच्या पलिकडे असावीत बहुधा ती..

# *आमच्या कालयंत्राची गोष्ट*

माझे शेवटचे काम आटोपले. सगळे काही चेक केले. सगळ्या वायर्स जिथल्या तिथे होत्या. सर्व दिवे नीट चालत होते. बीपर्स चालत होते ठीक. मी निघणार इतक्यात आठवण आली नि मी मागे फिरून माझे ऑटोग्राफ बुक नि पेन नि पेन्सिल बरोबर घेतली. पेन्सिल कशासाठी? तर पेन नाही चालले तर म्हणून. माझ्या मित्रांनी माझ्याकडे प्रूफ हवे म्हणून सांगितलेले.. एक फोटो हवेत आणि दुसरे, स्वाक्षरी हवीच ज्यांना भेटेन त्यांची. माझ्या प्रयोगाचा हा कळसाध्याय होता. इतक्या वर्षांची मेहनत सफल होणार होती. काही चूक झाली तर मात्र कठीण होते. मी जातोय त्या काळातून परत आलोच नाही तर?इतिहासात गुडूप होऊन जाणार की काय मी? पण तरी स्वतःच्याच संशोधनावर अविश्वास कसा काय दाखवणार होतो मी?

निघण्याआधी मात्र मी सगळ्या गोष्टींची साद्यंत नोंद एका डायरीत करून ठेवली. एस्केप मिशन नावानी. त्यात मी निघण्याची वेळ, परतण्याची अपेक्षित वेळ आणि मी परत न आल्यास कोणती बटणे दाबावीत वगैरे लिहून ठेवले. पहिला प्रयोग म्हणून मी माझ्या काही मित्रांना त्याबद्दल माहिती दिलेली. सगळ्यांनी ऐकून घेतले. बहुतेकांनी पाठीमागे माझी याला वेड लागलेय म्हणून संभावना केली असणार .. माझा एक मित्र सोडून ..

"सदानंदा, तुला मी एकटा नाही सोडणार .. मी पण येतोय.."

महेश एकदम अधिकार वाणीने म्हणाला होता. त्यामुळे माझ्या कालयंत्रात दोघांसाठी जागा बनवणे भाग पडले होते मला. त्यासाठी थोडी डिझाईन पण मी बदललेली. आज या सगळ्या गोष्टींची फायनल परीक्षा होणार. तसे कालयंत्राबद्दल गोष्टींतून कित्येकदा वाचलेले. त्याबद्दलच्या सुरस आणि चमत्कारिक आणि बहुतेक वेळा अतिरंजित वाटतील अशा विज्ञानकथा वाचलेल्या. पण त्या कथा कधी भविष्यात सत्यात येतात किंवा येऊ शकतात यावर तेव्हा विश्वास नव्हता बसत

माझा. पण एका जिद्दीने मी कालयंत्र बनवायला घेतले त्याला तीन वर्षे उलटून गेलेली. महेश मध्ये मध्ये चौकशी करायचा, ते वगळता बाकीच्यांनी माझी गणती वेड्यांत करून टाकलेली. काही असो. मी प्रयत्न सोडले नाहीत आणि त्याचेच फळ आता मला मिळत होते. नाही म्हणायला महेश बरोबर होता त्यामुळे मला बरे वाटत होते.

आम्ही कालयंत्रात बसलो. बसता बसता महेशला म्हटले, "बघ अजूनही विचार कर. आपण साडेतीनशे वर्षे मागे चाललो आहोत खरे पण तेव्हा आपण समजा कीडा किंवा मुंगी असलो आणि त्या रूपात डायरेक्ट गेलो तर?"

पुनर्जन्मावर महेशचा गाढ विश्वास होता. आमची त्याबद्दल चर्चाही झालेली कित्येकदा. त्यामुळे त्याला चिडवण्यासाठी मी म्हणालो होतो ते.

"किंवा तू मांजर नि मी कुत्रा असलो तर?"

महेशने माझा प्रश्नांची टोलवला ..

"म्हणजे बघ, आपण साडेतीनशे वर्षे मागे पोहोचू.. मी कुत्रा .. कदाचित तोच, महाराजांचा निष्ठावान. पण म्हणून काय मी

मांजरी मागे लागणार नाही? तू मांजर. मी कदाचित तिथेच तुझ्या नरडीचा घोट घेईन.. बघ.. तू येतोस की मी जाऊ?"

महेशने धोबीपछाड घातला मलाच.

जास्त काही न बोलता मी यंत्र सुरू केले. माझ्या ॲडजस्ट केलेल्या वेगानुसार अठरा मिनिटांत आम्ही शिवकालीन रायगडावर असणार होतो. माझ्या मशीनचे वैशिष्ट्य होते हे. त्यात हवे ते स्थळ आणि तारीख घातली की त्या ठिकाणी त्या तारखेस पोहोचत होते मशीन. कालयंत्र बनवतानाच विचार केला होता मी. सर्वप्रथम दर्शन घ्यायचे ते शिवाजी महाराजांचेच. ते ही राज्याभिषेक होताना. प्रत्यक्ष महाराजांना भेटून त्यानंतर इतिहासातील काही मोठया लोकांना भेटायचे.. नक्की काय काय करावे हे पहिला प्रयोग यशस्वी झाल्यावर मी ठरवणार होतो.

कालयंत्र धुडूम आवाज करत निघाले. महेश आणि मी दोघे स्तब्ध होतो. यानंतर काय काय अद्भुत गोष्टी होणार आहेत याची वाट पाहात होतो. काही वेळातच आम्ही किल्ले रायगडावर होतो..

महेश आणि मी भारावून गेलो अगदी. राज्याभिषेकाची धामधूम सुरू होती. आम्ही यंत्रातून उतरण्या आधी वेळ चेक करून घेतली. पंधरा मिनिटे रायगडावर थांबून आम्ही निघणार होतो. यंत्रातून निघून आम्ही खाली आलो. गडावर समोर महाराजांचा राज्याभिषेक सुरू. इतिहासातली नावे आठवत आम्ही एकेकास आमच्या मनाने ओळखू लागलो. गडावर लोकांची बोली वेगळी. कपडे वेगळे. आम्ही शहरी कपड्यात. एकाएकी माझ्या लक्षात आले, आम्ही पोहोचलो तर होतो त्या काळात, पण तिकडे कुणालाच आम्ही दिसत नसावे. कारण आम्ही इतके वेगळे दिसत असूनही कुणी आमची दखल घेत नव्हते. शिवाजी महाराजांना आम्ही लवून मुजरा केला. आमचेच काय सर्वांचेच दैवत समोर बसलेले त्यामुळे आमची नजर महाराजांवर खिळून राहिलेली. बाजूला संभाजी राजे असावेत लहानगे. इतिहास माझा कच्चा विषय. त्यामुळे राज्याभिषेकासमयी कोण कोण हजर होते यांची आताच्या इतिहासात झालेली नोंद मी कधी वाचली नव्हती. आमची पंधरा मिनिटे संपली. कालयंत्रात काही बिघाड होऊ नये म्हणून लगेच निघणे भाग होते. महाराजांकडे बघून आपल्या फारच लहान असण्याची जाणीव झाली. त्यामुळे महाराजांसोबत

फोटो काय नि सही काय.. कसलेच भान राहिले नाही. आणि यंत्रात बसल्यावर लक्षात आले, आम्ही कोणाला दिसत नव्हतोच.. तर हे स्वाक्षरी नि फोटोचे जमावे कसे? भारावून आम्ही परतलो.. परत येताना एक शब्दही बोलणे नाही झाले.

इतिहास हा नावडता विषय असला तरी इतिहासातील व्यक्तींबद्दल मला आकर्षण आहे. त्यामुळे महेशच्या साथीने वेगवेगळ्या महान नि महनीय व्यक्तींना बघण्यासाठी आम्ही पूर्ण यादीच बनवून टाकली. माझ्या यंत्रात घालण्यासाठी एक विशिष्ट तारीख आणि स्थान यांची आवश्यकता होती. त्यावेळी त्याठिकाणी ती व्यक्ती असणार आणि तिचे आम्हाला दर्शन घडणार. त्यासाठी इतिहासाचे ज्ञान आवश्यक होते. इथे मनीषा म्हणजे महेशची मैत्रीण आमच्या मदतीला आली. ती आम्हाला संशोधन केल्यासारख्या तारखा नि ठिकाणे काढून देई. मग आम्ही त्या कालयंत्रातून सर्वांचे दर्शन घेऊन येत असू. आम्ही कित्येक जणांचे दर्शन घेतले.. बाजीराव पेशवे, राघोबादादा, माधवराव पेशवे, अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई, राणा प्रताप, अकबर आणि बिरबल.. ऑगस्ट क्रांती मैदानात

गांधीजी, लाल किल्ल्यावर नेहरू, शास्त्रीजी, आझाद हिंद सेनेत सुभाषचंद्र, अंदमानात सावरकर.. यादी मोठी होती. एका तासात जाऊन आम्ही दर्शन घेऊन

परत येत होतो. माझे यंत्र अगदी व्यवस्थित साथ देत होते. खरेतर आता ऐतिहासिक व्यक्तींना भेटण्याची म्हणजे बघण्याची धुंदी माझ्या यंत्राच्या नवलाईहून जास्त होती. अगदी सवयीने आम्ही जात येत होतो.

त्यात एक दिवस महेश म्हणाला, "सदानंदा, मनीषाला आपल्या यंत्रातून येण्याची खूप इच्छा आहे.. तिला पानिपतला भेट द्यायची आहे. भर लढाईच्या वेळी."

मनीषा म्हणजे महेशची मैत्रीण.. गेल्या तीन वर्षात त्यांच्या मैत्रीने किती प्रगती केली त्याबद्दल मला ठाऊक नव्हते, कारण मी माझे कालयंत्र बनवण्यात गुंग होतो. मनीषा आम्हाला इतिहासाचे इनपुट्स देत होती, मदत करत होती. पण महेशच्या हाती कालयंत्र सोपवणे तेही मनीषा बरोबर असताना थोडे धोक्याचे होते. आजवर मी यंत्र ऑपरेट करत होतो. महेश बघायचा नुसताच, पण त्याने काही गोंधळ घातला तर? पण मनीषाला इतक्या मदतीनंतर नाही म्हणणे कठीण होते.

"महेश, तू नक्की लक्ष देऊन वापरशील कालयंत्र? तिकडे जाऊन काही गडबड झाली तर अडकून पडशील..'

"छे रे! मी बघून बघून शिकलोय.."

"ठीक.. अजून एकदा शिकून घे. आणि कालयंत्र सुरू झाल्याशिवाय हे गेट बंद करायचे नाही .." मी कालयंत्राच्या दरवाजाकडे बोट दाखवत म्हणालो.

"आणि माझ्याकडे इथे इमर्जन्सी कंट्रोल आहेतच. पंधराव्या मिनिटाला तू परतण्याचा संदेश नाही मिळाला तर मी इकडून तुम्हाला परत आणेन. घड्याळाकडे लक्ष ठेव.. यात चूक चालणार नाही.."

एक सांगितले पाहिजे, कालयंत्र तर मी बनवलेले पण पंधरा मिनिटांत त्याचा परतीचा प्रवास करावा लागे. त्याच्यावरच्या सोलार पॅनेल्सनी बॅटरी तेवढ्या वेळेसाठीच चार्ज होई. त्यामुळे तसे झाले नाहीतर यंत्र मध्येच बंद पडण्याचा धोका होता.

मनीषा आणि महेश पानिपतच्या लढाईच्या दर्शनासाठी निघून गेले. जीव टांगणीला लावून मी वाट पाहात बसलो. यंत्र पोहोचून पंधरा मिनिटे उलटली, ते परतण्याचा सिग्नल काही

दिसेना. क्षणाचाही विलंब न करता मी इमर्जन्सी यंत्रणेची बटणे दाबली..

थोड्याच वेळात माझे ते कालयंत्र धडधडत  परत आले.. आतून निघाला तो फक्त महेश ..

"मनीषा?"

"ती चुकून मागे राहिली .."

"मागे राहिली म्हणजे?"

"मी कालयंत्रात चढलो. ती बाहेर होती.. आणि एकाएकी तू इकडून यंत्र माघारी बोलावून घेतलेस.."

"पण ती बाहेर काय करत होती?"

"मनीषा? ती सेल्फी घेत होती.. कालयंत्राबरोबर.. आता?"

"आय डोन्ट नो.. काय करूया? दोन अडीचशे वर्षांपूर्वी आणि भर लढाईत सोडून आलास तू तिला .. आणि सेल्फी घ्यायला तिला तीच वेळ आणि जागा मिळाली? दरवाजा बंद का केलास..?"

महेश रडवेला झालेला.. आता तिला आणायचे तर किमान दोन तास सोलार पॅनेल चार्ज व्हायला हवे.. तोवर ती तिकडे .. घाबरली असेल की इतिहासकार म्हणून युद्धाचा आँखो देखा हाल पाहात असेल? पण महेश मात्र घाबरला होता.

खूप विचार करून आम्ही प्लॅन बनवला.

आम्ही दोघे निघालो. खरेतर मी एकट्याने जायला हवे होते, कारण यंत्रात दोन जणच बसू शकत होते एका वेळी. पण महेशचा प्रेमी जीव तिला भेटायला आतुर झालेला. त्यामुळे मी तिला घेऊन येईन आणि अजून एका फेरीत महेश परत येईल..

आम्ही पोहोचलो तर मनीषा तिकडे मजेत होती.. महेशला पाहताच खोटी खोटी रागावत म्हणाली, "मला सोडून कसा गेलास.. बोलू नकोस माझ्याशी." तिकडे मी पण होतो, पण मी नसल्यासारखे बोलणे होते तिचे. एकाएकी मला पाहात म्हणाली,

"सॉरी हां.. ह्याच्यामुळे तुला परत यायला लागले!"

सेल्फी काढत थांबलेली ती.. आणि यंत्रात बसण्याचे सोडून बाहेर राहिलेली ही तीच.. पण दोष महेशचा? असेल प्रेमी जीवांचा वेगळा काही हिशेब ..

"कित्ती मस्त लढाई सांगू .. तो अब्दाली आला चालून.. सदाशिवरावांची लढाई पाहिली आणि दत्ताजी शिंदे पण.. बचेंगे तो और भी लडेंगे बोलताना पण ऐकली .. तू हवा होतास.."

"मनी, लढाई बघत होतीस की सिनेमा?" महेश म्हणाला तशी ती फुरंगटून म्हणाली,

"तू एक शब्द बोलू नकोस माझ्याशी.."

अधिक काही होण्याअगोदर मी म्हणालो,

"मनीषा, सध्या लगेच आपल्याला परत जायला लागेल .."

"आणि माझा महेश?"

"त्याला दुसऱ्या फेरीत आणेन मी.. तू सिनेमा पाहिलास ना आता त्याला पाहू दे थोडावेळ.."

दोन तीन तासांचा विरह! ती वेदना चेहऱ्यावर दिसत होती तिच्या पण आता इलाज नव्हता. आम्ही दोघे कालयंत्रात बसलो..

आजचा दिवसच असा असणार .. कारण यंत्र सुरूच होईना. सारे काही तपासून पाहिले मी.. पण त्यातला दोष सापडेना. मनीषा खाली उतरली नि आरामात महेशच्या हातात हात घालून पानिपतची लढाई बघत बसली.. नि मी .. कालयंत्राशी लढाई करत बसलो.. शेवटचा पर्याय म्हणून मी एस. ओ. एस. चे बटण दाबले.. आणि वाट पाहात बसलो.

कालयंत्र इकडे बंद पडलेय. आणि महेश नि मनीषा बिनधास्त गप्पा मारताहेत चौपाटीवर असल्यासारखे? मनीषा मधून मधून हात करून लढाईतल्या प्रमुख पात्रांची ओळख करून देत होती. प्रसंग बाका होता पण दोघांना त्याचे काहीच वाटत नव्हते .. मला प्रथमच प्रियाची आठवण झाली. गेले सहा महिने ती रोज येऊन बसतेय पण मीच टाळतोय तिला.. उगाचच कामाच्या नावाखाली.

थोड्याच वेळात एक नवे कालयंत्र येऊन थांबले बाजूलाच. त्यातून एक गोरा बाहेर आला.. माझ्याकडे पाहात म्हणाला, "हाय सदानंड.. मि. विल्सन हिअर .."

आमचा कालयंत्राने झपाटलेल्यांचा एक आंतरराष्ट्रीय ग्रुप होता. त्यातील एक एक गळत गेले. शेवटी आम्ही दोघेच उरलो. विल्सन ब्रिटिशर. त्याला पहिल्यांदाच भेटत होतो मी.. आमच्या संकेतानुसार कोणाला अगदीच इमर्जन्सी आली तर हा एस. ओ. एस. संदेश होता.

"हाय विल्सन .. धिस सीम्स आऊट ऑफ ऑर्डर.."

"ओके .. बट व्हॉट आर यू डुईंग हियर.."

मग समोरच्या लढाईकडे पाहात म्हणाला, "ओह.. तू आणि तुझे इतिहासाचे वेड.."

एवढे मोठे नवीन कालयंत्र येऊन थांबले तरी महेश आणि मनीषा स्वतःतच दंग होते. एकदा वाटले दोघांना असेच सोडून

द्यावे अडीचशे वर्षांपूर्वीच्या काळात.. जागे होतील तर बसतील बोंबलत. पण मनीषाची इतकी मदत झालेली.. तिच्यासाठी तरी असे करून चालणार नाही. त्यांना त्यांच्या स्वप्न समाधीतून जागे केलेच मी..

मग आता कोणी कसे जायचे याच्यावर वाद होणार होता.. पण दोघेही एकदमच म्हणाले, "आमची चिंता नकोस करू.. तू हो पुढे. संध्याकाळ पर्यंत ये परत म्हणजे झाले!" मग मी आणि विल्सन निघालो. प्रथम त्याचा बेस कँप नि तिकडून माझा. माझ्या बेसवरून माझे ते यंत्र दुरूस्त व्हायला हवे. मग विल्सनला घेऊन परत पानिपतावर..

मी बेस कँपवर पोहोचलो. आम्ही येत नाही हे पाहून इकडच्या हुशार लोकांनी बटणे हवीतशी वर खाली केलेली. त्यामुळे ते कालयंत्र बंद पडलेले पूर्णपणे. आम्ही बटणे ठीकठाक केली. विल्सनची बॅटरी चार्ज करून परत पानिपतावर पोहोचलो.

महेश आणि मनीषा अजूनही एकमेकांत दंग होते.

मला पाहताच महेश म्हणाला, "अरे इतक्यात पोहोचलास कसा?"

"इतक्यात? तुझा सिनेमा सुरूच आहे वाटते अजून?"

समोर घनघोर लढाई सुरू होती. आता परतीचा प्रवास. एका यंत्रात दोघे बसणार. महेश आणि मनीषाला माझ्या यंत्रात सोडायला तयार नव्हतो मी. परत काही गोंधळ घातला तर? मला वाघ, शेळी आणि गवत पैलतीरी न्यावे कसे एकमेकांपासून सुरक्षित ठेवून असे काहीतरी कोडे आहे त्याची आठवण झाली. शेवटी मनीषा कशीबशी माझ्याबरोबर येण्यास तयार झाली.. विल्सन महेशला व्हाया लंडन सोडणार होता.

आम्ही निघालो. मनीषाला म्हटले, "काय कसा होता अनुभव?"

"मस्त! पानिपतच्या लढाईवर आता मी मस्त काही लिहून काढते.."

"पण तू इकडे अडकलेलीस.. टेन्शन नाही आले तुला?"

"छे! माझा महेश काहीतरी करून येईलच.. खात्री होती मला. आपण पोहोचल्यावर महेश खूप उशीरा तर नाही ना येणार?"

इकडे प्रसंग कसला ओढवलेला आणि ही प्रेमप्रसंगाची गोष्ट करतेय? की हा प्रताप त्या प्रेमाचाच आहे?

आम्ही पोहोचलो, पाठोपाठ काही तासांनी महेश आला. विल्सनला गुडबाय करून मी माझ्या कालयंत्राला चार्जिंग मध्ये ठेवले. पुढे कित्येक दिवस मी त्यात कुठे गेलो नाही. आणि एके दिवशी विल्सनचा एस. ओ. एस. मेसेज आला. शंभर वर्षे पुढे जाऊन पठ्ठ्या पॅसिफिक महासागरातल्या एका बेटावर अडकला होता. मला इतिहासाची हौस तर ह्याला पूर्ण जगाच्या भूगोलाची. त्याची सुटका करून निघालो .. विल्सनला म्हटले, "वुई शुड इंप्रोव्हाइज अवर मशीन्स .. पंधरा मिनिटे वेटिंग इज टू शाॅर्ट अ टाईम .. आणि हे पाॅइंट टू पाॅइंट चालते ना मशीन.. त्यात ही सुधारणा पाहिजे. कुठूनही कुठेही जाता यायला हवे!"

आता आम्ही ह्या सुधारित व्हर्जनवर काम करतोय. यावेळी नव्या कालयंत्रात प्रियाला घेऊन जाईन.. असे वचनही दिलेय मी तिला!

# *ओळख*

न्यू न्यूरोकेअर हाॅस्पिटलामध्ये आज मोठीच धामधूम होती. तिसऱ्या मजल्यावरच्या मुख्य ऑपरेशन थिएटरमध्ये आजूबाजूला दोन थिएटर्स. सकाळपासूनच दोन्हींमध्ये सिस्टर्स आणि डॉक्टर्स धावपळ करत होते. सगळीकडे कडक निर्जंतुकीकरण केलेले. एका थिएटरमध्ये एक शस्त्रक्रिया डॉ.पांडेंनी सुरू केलेली. दुसरीकडे डॉ.मांडकेंनी. दोघांची कामे तशी अवघड.

फार पूर्वी ब्रेनडेड पेशंट्सचे वेगवेगळे अवयव दान केले जायचे. ह्रदय, लिव्हर, किडनी वगैरे कित्येक अवयव प्रत्यारोपणासाठी वापरता यायचे. पण आता नवीन गाइडलाइन्स आल्या. ब्रेनडेड म्हणजे मृतावस्थेतला मेंदू. एकदा मेंदू मृत झाला की माणूस त्याचा श्वास सुरू राहिला तरी नि ह्रदय धडधडत असले तरी परत ठीक होणार नाही हे वैद्यकीय क्षेत्राने

आणि त्याहून महत्त्वाचे कायद्याने मान्य केलेले. त्यामुळे त्याचे विविध अवयव प्रत्यारोपणासाठी वापरता येतात. त्यात आता प्री ब्रेन डेड म्हणून मेंदूच्या स्थितीचे नवे वर्णन करण्यात आलेले. म्हणजे मेंदू आता अजून काही काळात मृतवत होईल. त्याआधीच म्हणजे पूर्णपणे मृत्यू होण्याआधी तो काढून त्याचे प्रत्यारोपण शक्य आहे.. आजवर असे झाले नाही त्यामुळे हा प्रयोगच आहे. आणि त्यात दोन मेंदू हाताळले जाणार. मेंदूसारखा नाजूक अवयव. पूर्ण मृत होण्याच्या आत हलकेच काढणे.. त्याचवेळी त्याला जिवंत ठेवणे. हे सुरू असतानाच ज्याला मेंदू प्रत्यारोपण करायचे त्याचेही त्याचवेळी सारे ऑपरेशन पार पाडून नव्या मेंदूला जागा करून देणे.. एकूण अतिकुशल नि त्याचबरोबर अतिजलद कामाची गरज होती. डॉ. पांडे त्यांचे टीम लीडर. विख्यात न्यूरोसर्जन. त्यांच्या बरोबर डॉ.मांडके. आणि डॉ.पंड्या न्यूरॉलॉजिस्ट. आजवर ब्रेन ट्रान्सप्लांटवर किमान पंधरा आंतरराष्ट्रीय परिषदांत भाषणे दिलेली त्या तिघांनी. पण जोवर प्रत्यक्षात ते होत नाही तोवर भाषणे ही भाषणेच राहाणार होती. त्यामुळे आज प्रत्यक्ष संधी मिळत असताना ती साधण्यासाठी धडपड सुरू होती. प्रत्यक्षात

तसे झाले तर प्रत्यारोपणातील आणि एकूण वैद्यकीय विश्वातील हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार होता.

आज एक प्री ब्रेन डेड.. म्हणजे मेंदू पूर्णपणे मृत होण्याआधीचा.. अपघातात सापडलेला रूग्ण त्यांच्या हाॅस्पिटलात आला, तसा त्यांनी मेंदू प्रत्यारोपणाचा निर्णय क्षणार्धात घेऊन टाकला. प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. सातारकरबुवा त्यांचे एक जुने रूग्ण होते. गेले काही वर्षे त्यांचे उपचार डॉ. पांडेंकडेच सुरू होते. सातारकर बुवा म्हणजे प्रसिद्ध प्रवचनकार. सत्शील, पुण्यवान आणि हजारोंच्या आदरास पात्र असे सातारकरबुवा. गावोगावी कीर्तन करीत फिरणे.. त्यांची कीर्तने म्हणजे मधुर आणि रसाळ वाणीने ये ह्रदयीचे ते ह्रदयी घालणे.. त्यातून लोकांना चार शहाणपणाचे शब्द ऐकवणे.. त्यांच्या असंख्य श्रोत्यांपैकी कुणीतरी शहाणा होईल या अपेक्षेत वर्षानुवर्षे त्यांची कीर्तने होत होती. बुवा पंच्याहत्तरीच्या घरात पोहोचले आणि त्यांचे हात कापू लागले. डोके हलू लागले. दोन पावले उचलणे मुश्किल, शब्द तोंडातल्या तोंडात अडकू लागले. त्यामुळे कीर्तन करणे म्हणजे

अशक्यातली बाब. त्यामुळे बुवा घरीच होते. उपचार सुरू होते. पण पार्किन्सनच्या या आजारात त्यांचा पूर्ण उपयोग होणे अशक्यच होते. त्यातल्या त्यात हाताचे कंपन थोडे कमी झालेले नि चालता चालता पडणे कमी होऊन काठी घेऊन ते चालायला लागलेले इतकेच. पार्किन्सनच्या आजारात आजवर मेंदू प्रत्यारोपणाबद्दल विशेष विचार झाला नसला तरी मेंदूत बिघाड होण्याच्या आजारात मेंदूच नवा बसवणे हा पर्याय तसा शास्त्रीय होता. आजवर डॉ.पांडेंनी बुवांच्या घरच्यांना त्यासाठी तयार करून ठेवलेले. उपचारादरम्यान त्यांना मेंदूच्या प्रत्यारोपणाच्या शक्यतेची कल्पना दिलेली. हे आजवर झाले नाही, पण शक्य आहे.. पण अर्थातच त्यात धोकेही आहेतच. सद्य स्थितीत बुवांची प्रकृती एका मर्यादेपलीकडे सुधारणार नाहीच. तेव्हा ही संधी घेणे त्यातील धोक्यांसह आवश्यक. मेंदूचा रक्तपुरवठा आणि मेंदूस लागणारे ग्लुकोज जरा कमी पडले की मेंदूत बिघाड व्हायला लागतो. त्यात बुवांचा मेंदू काढून नवा बसवण्यापर्यंतच्या काळात श्वास आणि हृदयाचे कार्य कृत्रिमरित्या चालू ठेवणे हे आणखीच आव्हानात्मक. बुवांची पंच्याहत्तरी ओलांडलेली त्यामुळे वयोमानानुसार शरीराची शक्ती पण कमी पडू शकते. त्यामुळे अगदी ऑपरेशन

टेबलावर त्यांचे बरेवाईट होण्याचीही शक्यता त्यांनी सगळ्यांपासून लपवून ठेवली नव्हती. "डॉक्टर तुम्ही म्हणाल तसे.." डॉक्टर पांडेंच्या सुदैवाने घरच्यांनी पूर्ण विश्वास टाकला नि प्री ब्रेन डेड मेंदू मिळाला तसा बुवांच्या शस्त्रक्रियेचा तात्काळ निर्णय डॉक्टर पांडेंनी घेतला.

शस्त्रक्रिया दोन्ही रूग्णांच्या नाजूकच. जाणाऱ्या रूग्णाचा मेंदू कुठेही इजा न होता त्याच्या नसांसकट मोकळा करणे.. ते होताना त्याचा रक्तपुरवठा सुरू ठेवणे.. मेंदूच्या आतून बारा क्रेनियल नर्व्हज् बाहेर पडतात त्यांना नीट सुट्या करुन काढणे नि मेंदूच्या खालील भागात मेडूयुला ऑबल्यांगेटामध्ये श्वास आणि हृदयाच्या नियमनाची केंद्रे असतात त्यांची काळजी घेणे.. मग पाठीच्या कण्यात शिरणाऱ्या स्पायनल कॉर्डला वेगळा करणे.. दोन्ही रूग्णांवर एकाचवेळी साधारण एकाच प्रकारच्या शस्त्रक्रिया पार पडल्या की पुढे नवा मेंदू बुवांच्या कवटीच्या आत बसवणे. हे करताना प्रत्येक नस आणि नस एकमेकांना जोडून घेणे महत्त्वाचे. मेंदूतून निघणाऱ्या बारा नर्व्हज् म्हणजे डोळा, कान, नाक, जीभ अशा महत्त्वाच्या

स्पेशल सेन्सेसच्या नर्व्हज. आणि खाली स्पायनल कॉर्डला जोडणे म्हणजे सर्वात कठीण काम. ह्यासाठी सगळी टीम एकाचवेळी कामाला लागलीय. सर्व कामे भराभरा अत्यंत काळजीपूर्वक पार पडताहेत. बुवांचा श्वास नीट सुरू आहे नि हृदय ही मजबूत आहे. त्यामुळे हे सारे यशस्वी होणारच असा डॉ.पांडेंचा दुर्दम्य विश्वास आहे.. मेंदूची पूर्ण जोडणी पार पडली. जुने हाड असेल .. मजबूत. त्यामुळे असेल, बुवांनी शस्त्रक्रिये दरम्यान चांगलाच तग धरला.

शस्त्रक्रिया पार पडली. नसांची जोडणी होऊन त्या रिजनरेट होण्यास थोडा काळ जावा लागेल. पण एकदा मेंदू जोडला गेला नि त्याचे काम व्यवस्थित सुरू झाले की शस्त्रक्रिया पूर्ण यशस्वी झाली म्हणायची. डॉक्टर पांडे आणि डॉक्टर मांडके दोघेही बारकाईने लक्ष ठेऊन होते बुवांवर. बुवा अजून पूर्ण शुद्धीत नसले तरी बाकी सर्व सिस्टिम्स व्यवस्थित सुरू होत्या बुवांच्या. श्वास नि हृदय, लिव्हर नि किडनी सारे काही यथास्थित सुरू. याचा अर्थ नव्या  मेंदूतून महत्त्वाची सारी शरीरप्रक्रिया व्यवस्थित कंट्रोल होतेय. पण बाकी मेंदूचे कार्य? बुवा एकदा

शुद्धीवर आले की पुढचे सारे लक्षात येणार होते. तीनचार दिवसांत हातापायांची बोटे बुवा हलवू लागले, स्वतःहून. कुठे सिस्टरने इंजेक्शन द्यायला घेतले की त्यांच्या चेहऱ्यावर वेदनाही दिसायला लागल्या. डोळे उघडणे बाकी होते. उठून बसतील, व्यवस्थित चालतील.. डॉक्टरांनी याबद्दल आशादायक चित्र उभे केले होते. सगळे उत्सुकतेने त्या दिवसाची वाट पाहात होते.. आणि तसे झाले तर पार्किन्सनवर हा अंतिम विजयच गणला जाणार होता. आणि जगातली पहिली मेंदू प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया.. ती ही यशस्वी. आजारातून बुवांची सुटका होणार होती. सगळ्यांचे लक्ष त्यामुळे ह्या पहिल्यावहिल्या मेंदू प्रत्यारोपणाकडे लागले होते. आणि आजवरची एकूण परिस्थिती पाहता त्यात यश येण्याचीच चिन्हे दिसत होती.

दोन आठवड्यात बुवांनी हात पाय स्वतःहून हलवण्यास सुरूवात केली. एके दिवशी डोळे उघडून ते आजूबाजूला पाहायला लागले. डोळ्यांत ओळख नसली अजून, तरी त्यांना दिसत असावे व्यवस्थित असा डॉक्टरांचा अंदाज होता. हात

हलवून ते प्रतिसाद देऊ लागले. थोडक्यात ही शस्त्रक्रिया यशस्वी होण्याची सारी लक्षणे दिसायला लागली. अजून बोलत नव्हते बुवा. चालत ही नव्हते पण हात हलवताना त्यात कंपने नव्हती.

हळूहळू बुवा उठून बसायला लागले. नाकातून नळीने खाणे जायचे ते आता स्वतः तोंडाने खायला लागले. फिजियोथेरापीच्या व्यायामांनंतर उभे राहायला लागले. आणि एक दिवस चालू फिरू लागले. त्यांच्या पार्किन्सनच्या आजारात सुधारणा दिसत होतीच. फक्त अजूनही बुवा खाणाखुणांनी बोलत होते.. तोंड हलतेय पण शब्द फुटत नाहीत अशी अवस्था. डॉक्टरांनी आशा सोडली नव्हती अजूनही.

त्यांची बायको पुतळाबाई डॉक्टर पांडेंना काकुळतीच्या सुरात विचारायची, "डॉक्टर हे ओळखणार नि बोलणार कधी?"

डॉक्टर म्हणायचे, "मावशी, इतके दिवस कळ काढली ..अजून थोडी वाट पहावी लागेल .."

"तुमचे खरेय डॉक्टर. त्या विठोबालाच चिंता म्हणायची."

"मला आशा आहे मावशी, आज ना उद्या बुवा सर्वांना ओळखतील.. बोलतील, अगदी कीर्तन ही करतील बघा."

"तसे झाले तर विठोबा पावला म्हणायचा. पण आता तर हे चालू लागले, फिरू लागले हा पण चमत्कारच म्हणायचा .."

दोन आठवडे अजून गेले. बुवा सुधारत होते. हातापायांची हालचाल व्यवस्थित होत होती. बोलण्यासाठी शब्द तोंडातून फुटत नव्हता. बुवा घरी आले. खाणाखुणांनी काही बाही सांगू लागले .. बुवा नुसतेच होते.. कोणाला ओळख न दाखवता. पुतळाबाईंनाही नव्हते ओळखत ना आपल्या मुलांना. बुवा ओळखतील, बोलतील.. कधी?

सारे त्याच दिवसाची वाट पाहात होते..

आणि एके दिवशी चमत्कार झाला. बुवांच्या तोंडून शब्द बाहेर पडू लागले.. सारे अचंबित होऊन ऐकत राहिले .. बुवा बोलायला लागले. ऑपरेशन नंतर दोन महिन्यांत. बुवांची रसाळ आणि मधुर वाणी परत ऐकू येणार ..

पण झाले भलतेच. आजवर आयुष्यभर स्वच्छ आणि देवाचे नाव घेत बोलली जाणारी त्यांची वाचा .. एकाएकी

शिवराळ झाली होती. बुवांचे वागणे बदललेले.. भाषा बदललेली ..

अजूनही इकडे घरच्या कुणाला ओळखणे नाही. पुतळाबाई नि मुले घायकुतीला आली. बुवा आहेत पण ते त्यांच्या सारखे नाहीत. घरात आहेत पण घर त्यांचे नाही. आजूबाजूला सारी माणसे आहेत, पण ती त्यांची माणसे नाहीत..

बुवांच्या तोंडाचा पट्टा सुटलेला. त्यांना पकडून कुणी आणलेय.. नि घरी कधी घेऊन जाणार.. आपल्या कोणत्या घरी जायची गोष्ट बुवा करू लागलेत? भेटीला आलेले म्हणत, "बुवा काय कसे काय?"

यांचे उत्तर .."कोन बुवा न बिवा? बुवाबिवा नाय वळखत मी.. मला माझ्या घरी घेऊन चला. हिकडं कुटं घ्यून आला मला xxxx?"

सगळ्यांना वाटले, बुवांची शस्त्रक्रिया हा पहिला चमत्कार असेल तर त्यांच्या तोंडातली शिवराळ भाषा हा दुसरा चमत्कार ..

डॉक्टर पांडे आणि डॉक्टर मांडके दोघेही विचारात पडले. मेंदू प्रत्यारोपण तर यशस्वी झाले. पार्किन्सनवर विजय मिळवला .. पण हे काय व्हावे? बुवांचा मेंदू काम तर व्यवस्थित देतोय पण हे वागणे का बदलावे? घरातील कोणाला ओळखू नये.. भाषा इतकी बदलावी?

डॉक्टरांनी त्यांना भेटायला बोलावले ..

बुवा समोर बसलेले. इतकी वर्षे डॉक्टर पांडेंचे पेशंट ते, पण डॉक्टरांना ओळख दाखवत नव्हते.

डॉक्टर मांडकेंनी एखाद्या नव्या पेशंटला विचारावे तसे बुवांना विचारले,

"बाबा नाव काय? राहायला कुठे?"

"म्या? बजाप्पा गवांदे, राहनार सोलापूर. आणि साह्येब मी तसले काही धंदे नाय करत.. पोलिस साले फुकट अडकवतात. या बजाप्पाचे नावच मायला खराब. कुठे काही खुट्ट झाले की.. xxxx आनि ह्या लोकानी पकडून ठिवलंय हिकडं .. साह्येब तुमी तरी सांगा अन् घरी जाव द्या मला माज्या. घरी वाट पाहात असतील समदे.."

डॉक्टर पांडे आणि डॉ. मांडके विचारात पडले. एकाएकी काही लक्षात यावे तसे डॉ.पांडेंनी सिस्टरला बोलावून घेतले..

ज्या मृतदेहाचा मेंदू काढला होता त्या मृतदेहाचे पेपर मागवले ..

..त्यावर नाव होते.. बजाप्पा सीताराम गवांदे, राहणार सोलापूर .. आणि नोंद होती.. पोलिसांना चुकवता चुकवता त्याच्या गाडीला अपघात झालेला. त्यातच ओढवलेला मृत्यू ..

## *जमदग्नी डिव्हाइसची गोष्ट*

---

रा.ग. म्हणजे रामचंद्र गणफुले, हेडक्लार्क. सगळ्या कचेरीत मेहनती आणि डोकेबाज म्हणून प्रसिद्ध होते रा.ग. आजही ते आपल्या केबिनमध्ये बसलेले. पाय पसरून. रिकामटेकडे. तसे त्यांना काम नाही असे नाही. समोर फायलींच्या थप्प्या लागलेल्या आहेत. पण रा.ग. त्यांच्याकडे ढुंकूनही पाहात नाहीत. सरकारी नोकरीत एक बेसिक फिक्स्ड पगार असतो. तो दिवसभरच्या काम न करण्याचा नि ओव्हरटाईममध्ये मेहनत करून कामाचा फडशा पाडण्याचा एक्स्ट्रा पगार मिळतो हे डोकेबाज रा.ग.नी कधीच ओळखले होते. त्यामुळेच तर मेहनती नि डोकेबाज रा.ग. अशी ख्याती कमावलेली त्यांनी.

आज ही नेहमीप्रमाणे जेवण झालेले. अय्यर नि ते दोघांची खास जोडी. अर्थात रा.ग.नी आपल्या मेहनती स्वभावानुसार सगळ्या स्टाफच्या डब्यांची चव चाखून मग आपल्या डायनिंग

पार्टनरची निवड केलेली. अय्यरच्या डब्यातल्या इडल्यांचे नि डोशांचे नानाविध प्रकार, त्याच्याबरोबरच्या रस्समांचे, सांबार चटण्यांचे प्रकार नि नुसत्या दहीभाताच्या व्हरायटीवर खूश होऊन आपल्या हाताखालच्या व्यंकटेशन अय्यरला ही संधी दिली होती. एकत्र जेवण म्हणजे जेवणाचे आदान प्रदान आलेच. त्यांच्या सुदैवाने अय्यरला शुद्ध महाराष्ट्रीय जेवण आवडायचे.. त्यानुसार परस्पर सहाय्य आणि सामंजस्यावर दोघांची जोडी बनली होती. ते काही असले तरी डोकबाज म्हणून रा.गं चेच नाव होते कचेरीत. तर आज दुपारी नायलॉन इडलीला सांबारात बुडवून नि खोबऱ्याच्या चटणीत घोळवून खाल्ल्यावर ढेकर देत बसलेले रा.ग. कचेरीत वामकुक्षीची सोय का नसावी याचा नेहमीप्रमाणे विचार करत होते, तर आत रीटा डिमेलो सांगत आली,

"समवन देअर सर.. टू सी यू."

"पण त्या समवन ला नाव गाव काही नाही?"

"आय डोन्ट नो गाव सर.."

"आणि नाव?"

"दॅट आय नो.."

"मग सांग की. नाव घेतल्यासारखे लाजतेस कशाला?"

"व्हॉट सर?"

"काही नाही. कोण आहे?"

"सर समवन कॉल्ड .."

"हू कॉल्ड हिम?"

"सर.. लेम्मी कंप्लिट.. समवन कॉल्ड मिस्टर ताफरकेफर.. नो सर.. फातरकेफर.. सॉरी, मिस्टर फातरफेकर."

"काय काम आहे?"

"आय डोन्ट नो सर.. बट कसला तरी डेमो द्यायचाय ही इज सेइंग .."

"डेमो? व्हॉट डेमो?"

अशी पण जेवणानंतर झोप घालवायची होती त्यांना. याबाबतीत त्यांचा नियम होता एक. कचेरीत झोपायचे नाही. त्यामागे त्यांना झोपण्यासाठी बेड नसणे आणि बसल्या बसल्या झोपले तर मानेचे दुखणे बळावणे ही दोन कारणे खरी पण डोकेबाज रा.ग.नी आपल्याला ऑफिसच्या वेळेत कुणी झोपलेले खपणार नाही हे आपल्या हाताखालच्या लोकांत

पसरवून ठेवलेले. त्यामुळे इतर सरकारी दफ्तरांत आणि त्यांच्या सेक्शनमध्ये फरक जाणवायचाच. कारण लंचटाईम नंतरही त्यांच्या विभागात जागे राहणारे लोक दिसायचेच. आजही ही झोप उडवायला कुणी आयता आलाय म्हटल्यावर रा.ग. खुश झाले

"सेंड हिम इन.. बघू कसलाय डेमो ते.."

एक चाळिशीतला टायबिय गळयात लटकवलेला माणूस आत शिरला. रा.ग.ना टायची हौस खूप दिवस होती. टाय लावला की माणूस आपोआप मोठा असल्यासारखा दिसायला लागतो. पण ही

लग्नाआधीची गोष्ट. गळयातला टायला जेवणानंतर तोंड पुसताना पाहिले त्यांच्या पत्नीने एकदा आणि त्यांना टायबंदी लागू केली आयुष्यभरासाठी. आजही रूमालाने हात पुसताना त्यांना ते आपले टायवाले दिवस आठवतात. रूमाल नि टाय.. दोघांनी तोंड पुसण्यात फरक तर असणारच ना. त्या फातरफेकरच्या टायनी त्यांना अजूनच आठवण आली त्या टायची.

"येस.. बसा."

"नमस्कार. मी रघुवीर फातरफेकर. फ्रॉम यंग आंत्रप्रुनर असोसिएशन. आयॅम द ब्रांच हेड ऑफ पीस फाउंडेशन.."

"कुठल्या तुकड्याचा? पीस म्हणालात म्हणून विचारले."

त्याकडे दुर्लक्ष करीत शांतपणे रघुवीर पुढे बोलत राहिला.

"तर आमच्या कंपनीने एक नवीन मा ॅडेल डेव्हलप केलेय.. अँगर मॅनेजमेंट मधले."

"हँगर?"

"हँ नाही अँ. अँगर म्हणजे रागाच्या मॅनेजमेंटचे. सामान्यतः माणसाला राग येतो तेव्हा काय होते? की माणसाच्या मेंदूत दोन विभाग असतात. एक लिंबिक सिस्टीम .."

"मेंदूत लिंबू? की डोक्यात बटाटे?"

"तर राग आला की लिंबिक सिस्टीम प्रीफ्राँटल कॉर्टेक्सला संदेश पाठवते.."

"एस एम एस की व्हॉट्सॲप.. की इमेल?"

रा.ग. असे मध्ये बोलत राहिले तरी रघुवीर थंड डोक्याने ऐकून घेत बोलत राहिला.

"तर हा संदेश आल्यावर माणूस क्षणार्धात निर्णय घेतो.. रागवायचे की नाही. खरेतर हा संदेश येण्याच्या आत हा निर्णय होतो. मेंदूत रासायनिक क्रिया होते .."

"म्हणजे केमिकल लोच्या?"

"आपला प्री फ्रॉंटल कॉर्टेक्स आपल्याला विवेकाने वागण्याचे सिग्नल्स देत असतो. तिथे संदेश पोहोचण्याच्या आत माणूस रिॲक्ट करतो म्हणून त्याची रिॲक्शन तडकाफडकी होते. मग रागावल्यावर तो काहीही करू शकतो. चिडतो, ओरडतो. कधी हातघाईवर येतो."

"घाई.. तशी काही घाई नाही. बोला तुम्ही."

"तर हे संदेश पोहोचण्यासाठी जो वेळ लागतो काही सेकंद त्याची वाट पाहणे हा अँगर मॅनेजमेंटचा पाया आहे.."

"हो.." रा.ग. आपल्या पायाकडे पाहात म्हणाले.

"तर आम्ही जी सिस्टीम डेव्हलप केली आहे ती यावर बेस्ड आहे. म्हणजे हा जो वेळ आहे त्याचा उपयोग करून माणसाची रिॲक्शन तोवर डिले करणे. किंवा हे संदेश अधिक जलदगतीने पाठवणे.."

"म्हणजे टूजी पेक्षा फोरजी ने पाठवणे .."

"तर आमची सिस्टीम ह्या बेसिसवर काम करते."

"म्हणजे तेच. राग येत असेल तर एक ते दहा आकडे मोजा. मी तर शंभरपर्यंतही मोजायला तयार आहे! त्यासाठी पैसे मोजून असली सिस्टीम कशाला?"

"आमची सिस्टीम वेगळी आहे. समजा दोन व्यक्ती आहेत.."

"समजा कशाला .. आहेतच इथे. तुम्ही आणि मी. व्हाय अननेसेसरीली समजा? व्हाय मिरर फाॅर हातच्या झाकणाला नाही काकणाला.."

"तर समजा, ज्याला राग येतो आहे किंवा येणार आहे तो रागी .."

"रागी? की बाजरी?"

"आणि ज्याच्यामुळे राग येईल तो रागर .."

"रागर? हा कुठला नवा शब्द?"

"आणि एकाच वेळी दोघे रागावले तर? तुझा रॉजर आणि रॅगी रोल बदलतील फाटफाट.."

"एक्झॅक्टली साहेब. तुम्ही म्हणता ते खरेय.."

"एक मिनिट. तुम्ही पुढे सांगाच पण त्याआधी तुमच्या सिस्टिमची किंमत किती ते सांगून टाका. म्हणजे मनातल्या मनात कॉस्ट बेनिफिट रेशिओचे गणित होत राहिल.."

"अर्थातच. फक्त तुम्ही निष्कर्ष काढण्याआधी पूर्ण ऐकून घेतलेत .."

"द्याट यू डोन्ट वरी.. आयॅम ऐकिंग .."

"आमच्या सिस्टिमची वार्षिक किंमत, खरेतर सबस्क्रिप्शन आहे दिवसाला दहा रूपये फक्त.. म्हणजे ताशी आठाण्याहूनही कमी.."

"सेकंदाचा रेट सांगितलात तर.. पण माझ्या डोक्यात आता बसल्या बसल्या आयडिया आलीय.. दहा मण्यांची माळ बनवून वाटा सगळ्यांना.. लाइफटाइम दहा रूपये .. राग येतोय.. काउंट टेन मणीस.. अति राग येतोय .. परत मोजा .. हाय काय अन नाय काय..!"

"यस्सर.. तर आमची सिस्टिम .."

"फुस्स.."

"काय झाले सर?"

"सिस्टिमची किंमत ऐकून स्टिम बाहेर पडली तोंडातून."

"तर आमची सिस्टिम दोन्ही बाजूंनी काम करू शकते. म्हणजे आता समजा एक माणूस आहे.."

"समजा कशाला? आपल्या देशात माणसांची काय कमी आहे?"

"तो रोज ऑफिसला उशीरा पोहोचतो."

"हे समजण्याचीही गरज नाही .."

"त्याचा बॉस रोज त्याच्यावर रागावतोय.. चिडतोय.. तर बॉस ने काय करावे?"

"चिडावे, ओरडावे, लाल मार्क लावावा, पगार कापावा .. म्हणजे मला तर दररोज उशीर होतो म्हणून माहिती आहे.."

"तर सर समजा ही सिस्टिम बसवली .."

"व्हाय समजा? .. बसवलीच समजा .."

"तर रागर ने ही सिस्टिम बसवली तर रागीचा राग तो कंट्रोल करू शकतो.."

"व्हॉट डू यू मीन?"

"म्हणजे समजा तो रागर क्ष आहे.. आणि बॉस द रागी म्हणजे य, तर आमची सिस्टिम वापरून क्ष कॅन कंट्रोल य चा राग! म्हणजे ही सिस्टिम असेल तर य न रागावेल न ओरडेल. मग रेड मार्क आणि पगार कट तर दूरची गोष्ट. या पद्धतीत क्ष रागरच्या हाती समोरच्या य चा राग कंट्रोल करण्याची किल्ली आहे सर.. आजवरच्या अँगर मॅनेजमेंटमध्ये हे दुर्लक्षित झालेले. त्यात रागी स्वतः स्वतःचा राग कंट्रोल करेल.. ते ही इफ ही वॉंट्स टू. इकडे रागर विल डिसाईड! म्हणजे सिस्टिम वापरून खुशाल उशीरा येऊन साहेबापुढे उभे रहा. ही वोन्ट गेट अँग्री..

म्हणजे आमची सिस्टिम काय करते की इट सेंड्स सिग्नल्स, ज्यामुळे लिंबिक सिस्टिम .."

"पुन्हा लिंबू कुठून आणलेत?"

"लिंबिक सिस्टिम ते प्रीफ्राँटल कॉर्टेक्स सिग्नल्स पटकन पोहोचतील.. प्रीफ्राँटल कॉर्टेक्स मग सबुरीचा सल्ला देईल. त्यामुळे रिॲक्शन टाईम वाढेल. त्यामुळे माणूस रागावणे विसरेल.. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे इथे य रागीचा राग क्ष रागर कंट्रोल करेल.."

"काही वाटेल ते आणता माझ्यासमोर. टीव्हीवर येतात ना हजारो गोष्टी .. मी फक्त चार दिवस वापरले हे वजनॉल आणि माझे वजन चाळीस किलो कमी झाले.. किंवा माझ्या गुडघ्यांचे दुखणे पळाले .. आता मी पळू शकते.. वापरा गुडघा ॅल ऑयल.."

"नाही सर, आमची सिस्टिम पूर्णपणे शास्त्रीय आहे.."

"शास्त्रीय? टीव्ही नाही, बंगाली बाबाची आठवण येते मला .. भटको चाहे जिधर काम होगा इधर.. संपूर्ण वशीकरण.."

"नाही सर. आम्ही शास्त्रीय आधारावर पूर्णपणे तयार केलीय सिस्टिम. म्हणजे बघा, आज तुम्ही घरी गेलात. बायकोने सांगितलेय येताना अमूक अमूक गोष्ट घेऊन या .. तुम्ही विसरता नेहमीप्रमाणे आणि तमूक तमूक नेता अमूक अमूकच्या ऐवजी. मग काय ती चिडणार, ओरडणार. पण नाही. तुमच्याकडे आहे आता ही सिस्टिम. तुम्ही तुमच्याकडची ही सिस्टिम ऑन करणार. मग ती ओरडणे विसरून म्हणणार, होतं असं कधी कधी .. उद्या आणा.. नाहीतर मीच जाऊन आणेन. तुम्ही थकले असणार .. चहा घेता ना.."

"हे बघा मि. फातरफेकर, आतापर्यंत मी ऐकून घेतले पण हे शेवटचे उदाहरण म्हणजे अतिशयोक्तीचीही अतिशयोक्ती आहे.."

"नो सर. नो अतिशयोक्ती. फक्त फॅक्ट्स.."

"आणि यू वेर टू गिव्ह अ डेमो.. कुठे आहे डेमो? डेमो कुठेय? डोन्ट थिंक मी तुमच्या ट्रॅप मध्ये फसेन.. डेमो दाखवा नाहीतर गो बॅक इमिजिएटली. उगाच माझा वेळ खाताय. अँगर मॅनेजमेंट म्हणे. तुम्ही मलाच आता राग आणताय.. व्हेअर इज द डेमो?"

"यस्सर, थ्यांक्स. आता तुमच्या लक्षात आले असणार मी काय म्हणतो ते."

"व्यर्थ वायफळ बडबड नको.. फसवाफसवी दुसरीकडे नॉट विथ धिस रा.ग."

"यस्सर.."

रघुवीर शांतपणे उभा राहिला हातातील एक छोटेसे लाल बटण आणि शर्टाच्या खिशातून एक लहानसे मशीन काढून रा.ग.च्या समोर ठेवले.

"नाऊ धिस इज इट सर.."

"ही? ही तुमची सिस्टिम? अँड यू थिंक धिस वर्क्स? चिटींग अँड फ्रॉड.."

एकाएकी फातरफेकरचा आवाज चढू लागला..

"सर.. उगाच मी ऐकतोय म्हणून काही बोलू नका. इतक्या वर्षांच्या मेहनतीने बनवलीय सिस्टिम. घ्यायची तर घ्या.. नाहीतर राहिले .."

"वा! आता आले ना आपल्या वळणावर .."

"ऑफकोर्स सर, आमच्या मेहनतीवर शंका घेताय?"

"व्हाय आर यू गेटिंग अँग्री? सेल्सपर्सन शुड हॅव जिभेवर साखर आणि डोक्यावर बर्फ .. उगाच रागावणे शोभत नाही. यू आर द आयडियल एक्झांपल.. सेल्समन कसा नसावा .."

"यस्सर.." म्हणत रघुवीरने परत सिस्टिमचे बटण हाती घेतले. ते छोटेसे मशीन खिशात ठेवले.. त्या बटनावरचा नॉब वळवला आणि म्हणाला,

"पाहिलंत सर.. मी ही सिस्टिम काढून ठेवलेली तर मला लगेच राग यायला सुरूवात झाली. आधी तुम्ही मला काहीही

बोललात तरी फरक पडत नव्हता. मी जसे मशीन काढले तसा परत आय स्टार्टेड गेटिंग अँग्री. आता परत घातली सिस्टिम तर आयॅम कुल नाऊ. हेच तर ॲक्च्युअल डेमो आहे.."

"हे आणि डेमो?"

"यस् सर. यावर दोन अधिक एक तीन मोड्स आहेत. एक सेल्फ म्हणजे स्वतः स्वतःला कंट्रोल जो मी आतापर्यंत ठेवला आहे. दुसरा समोरच्याला कंट्रोल करण्यासाठी आणि तिसरा एकावेळी दोघांना कंट्रोल करण्यासाठी. मी सेल्फ मोडवर ठेवलाय तो. नाहीतर तुमचे आतापर्यंतचे बोलणे ऐकून कधीच निघून गेलो असतो.. ह्याच्यातून निघणाऱ्या वेव्ह्ज मुळे सगळे काम होते. यातील वेव्हज् मेंदूच्या त्या भागात पोहोचून संदेशवहनाची गती शंभरपटिने वाढवतात. त्या मुळे  लिंबिक सिस्टिम .."

"तो लिंबू का काही आहे तो बाजूला ठेवा.. पुढे बोला.." रा.ग. ना त्या लिंबिक सिस्टिम नि या फातरफेकराची सिस्टिम दोघांचा एकाचवेळी राग आला. पण रघुवीर शांत होता..

"सर, इट्स अ रिव्होल्यूशनरी प्राॅडक्ट. त्यामुळे व्यक्तींमधली भांडणे कमी होतील. रागावून होणारी हाणामारी

नाहीशी होऊ शकते. थोडक्यात जगात शांतता नांदावी यासाठी आमचा हा छोटासा प्रयत्न आहे.. अजून डेमो हवा असल्यास हे बटण फिरवून दाखवतो.. हाऊ आय कॅन कंट्रोल युवर अँगर.."

"नको. नाऊ आय गेट इट.. पण या सिस्टिमचे नाव काय आहे?"

"सर, इट्स कॉल्ड जमदग्नी डिव्हाइस. खरे आहे ते अँटि जमदग्नी पण जमदग्नी डिव्हाइस हे आपल्या संस्कृतीला धरून आहे. नॉट टू अँटागोनाईज आपले ऋषीमुनी.. हो की नाही? तर किती डिव्हाइस देऊ तुम्हाला? आजसाठी स्पेशल ऑफर आहे सर.."

नकळत रघुवीरने कंट्रोल नॉब फिरवला.

"सर, एकूण पेमेंट तीनहजार सहाशे पन्नास अधिक रिचार्जेबल बॅटरीचे दोन हजार, एक वर्षे मेंटेनन्स दोन हजार पाचशे आणि रजिस्ट्रेशन आणि टॅक्स सगळे मिळून नऊ हजार नऊशे .. त्यात आज युएसबी कॉर्ड, ही कॅरिंग केस फ्री आणि दहा टक्के ऑफर डिस्काउंट.. म्हणजे फक्त नऊ हजार. महिन्याला आठशेहूनही कमी सर..जस्ट साडे सातशे पर मंथ"

मारूतीच्या शेपटासारखी सिस्टिमची किंमत वाढत होती. रा.ग. शांतपणे ऐकत बसले होते. एरव्ही ते चिडले असते, पण आता त्यांना त्या सिस्टिममागची मेहनत जाणवत असावी की काय कोणास ठाऊक?

"काही हरकत नाही. तुमचे प्राॅडक्ट युनिक आहे मि.फातरफेकर. चेक घेऊनच जा.."

"थ्यांक्स मि. गणफुले. काही प्राॅब्लेम झाला तर माझा नंबर आहेच, त्यावर संपर्क करा.." चेक खिशात ठेवत रघुवीर उठला. आणि बाहेर पडता पडता त्याने परत सेल्फ कंट्रोलवर नॉब फिरवला..

## *करविता धनी..*

खिडकीतून तो आत शिरला. पाईपावरून चढून वर येण्याची त्याची ही पहिलीच वेळ. खाली उतरून कपाटासमोर उभा राहिला. हात वर पोहोचणार कसा? मग त्याची उंची हळूहळू वाढत गेली. हलक्या हातांनी कपाट उघडले त्यानी. समोरच लाल डबा होता दागिन्यांचा. तो हातात घेतला. बाजूला नजर फिरवली.. तर नोटांची थप्पी. ती पण हाती घेतली. काम आटोपले त्याचे. त्याची उंची परत कमी झाली. परतण्यास निघणार तोच रूममधला दिवा लागला. कुणीतरी आत आलेले.. समोरचे कपाट उघडे पाहून त्या माणसाने चोर चोर आरडाओरडा केला.. तो हळूच बेडखाली शिरला.. तिथे एक मोठाली बॅग होती, तिच्या मागे लपून राहिला. भर मध्यरात्री आरडाओरड्याच्या आवाजाने बिल्डिंगमध्ये लोक उठले.. सगळे त्या दुसऱ्या मजल्यावरच्या घरी धावले. पवारांच्या घरी आज चोरी झालीय.. आठवड्यापूर्वी असाच चोर शिरलेला

तळमजल्यावर.. सारे काही जिथल्यातिथे. ना दरवाजा तुटलाय ना खिडकी मोडलीय. चोरी तर झालीय पण चोराच्या हालचालीचा मागमूस नाहीये..

सगळ्यांनी इकडेतिकडे शोध घेतला.. कुणाचे लक्ष नाही हे पाहून तो खिडकीतून पसार झाला. त्याची यशस्वी म्हणावी अशी ही दुसरी चोरी.

इन्स्पेक्टर वागळे आठवड्यापूर्वीही आलेले.. आजही आले. दोन्ही घरांत कसून शोधाशोध करून गेले. ना कुठे पायांचे निशाण, ना हातांचे ठसे. चोरी झालीय दोन्ही घरी. पण कशी झाली? स्नीफर कुत्रा आणला.. त्याला ही कसला वास लागेना. दोन्ही घरी अशीच चोरी.. आधी तळमजल्यावरच्या मनसुखानींकडे चोरी झाली तेव्हा ही हीच गत. त्या मनसुखानींनी स्वतःच इन्शुरन्सच्या पैशांसाठी काही बनाव केला असणार अशी शंका वागळेंच्या मनात बळावत असतानाच ही तशाच पद्धतीने झालेली दुसरी चोरी. त्याच बिल्डिंगमध्ये.

इन्स्पेक्टर वागळेंना आता कळेना काय करावे? दोन चोऱ्या दोन आठवड्यात. कसलेच धागादोरे दिसत नाहीत. चोरीची पद्धत सारखीच. खालचा गुरखा म्हणतोय, 'नहीं शाब, न कोई आया न कोई गया.' तो शेरबहादूर कामाबद्दल एकदम सिन्सियर गणला जाणारा. बिल्डिंगला सीसीटिव्ही गेटवर लावलाय, त्यातही कसलीच हालचाल नाही. चोरी होतेय कशी? इन्स्पेक्टर वागळेंनी माणसे पाळतीवर ठेवली. आजूबाजूला चौकशी केली. सगळयांच्या नकळत पवार नि मनसुखानी दोघांच्या आर्थिक व्यवहारांची माहिती काढली पूर्ण. दोघांचे व्यवहार तसे चोख म्हणावे असे. मुख्य म्हणजे हरवलेल्या मुद्देमालाचा इन्शुरन्स त्यांनी काढलेलाच नव्हता. परत एकदा इन्स्पेक्टर आणि त्यांचे सहकारी बिल्डिंगमध्ये पोहोचले. सगळ्या बिल्डिंगचे चारी बाजूने फोटो काढले. चारी बाजूंनी बारकाईने पाहणी केली. कुठे कसलाच धागा दोरा मिळाला नाही..

वागळेंना उद्या एसीपी हळदणकरांना जवाब द्यायचाय. चोऱ्या झाल्यात.. त्याबद्दल त्या झाल्यात एवढे सोडून कसलीही माहिती हाती नाही. काय सांगणार होते ते? दुपारी

भेटायला जायचेय आणि सकाळ सकाळी परत फोन वाजला पोलिस स्टेशनला.. पहिल्या मजल्यावर चोरी झालीय! परत तेच. ना कसला पुरावा न धागा दोरा. आज खरडपट्टी निघणार, ती किती असावी त्याचा अंदाज लावत निघाले इन्स्पेक्टर वागळे. पहिल्या मजल्यावरचे घर मेस्त्रींचे. गेले काही दिवस घरी नव्हते ते. कालच आलेले परत. ते घरी नसताना चोरी न होता ते असताना व्हावी? आधीचे सारे फोटो घेऊन त्यांची तुलना करत बसले सगळे पोलिसठाण्यातले हेड कॉन्स्टेबल आणि कॉन्स्टेबल्स. निष्कर्ष इतकाच निघाला, कुठे धागा दोरा नाही. फक्त एकच, आधी मेस्त्रींची खिडकी बंद होती, ते काल आल्यावर उघडली आणि चोरी त्यानंतर झालीय. म्हणजे चोर खिडकीतून आला? खिडकीच्या गजांतून शिरणारा कोण असेल? लहान मूल एखादे? ते तरी आत कसे येईल? आणि असले तर ते कुठून येताना वा जाताना दिसायले हवे.. हवेतून उडून तर नाही ना येणार ते?

हेड कॉन्स्टेबल सावंतांच्या ह्या सवालानी वागळेंचे कल्पना चक्र सुरू झाले.. हवेत उडणारे चोर? पण हवेत उडले

कुणी तरी खिडकीतून शिरणार कसे? चोरी करून नाहिसे होणार कसे? उडत की उड्या मारत?£ एक गोष्ट अजून बुचकळ्यात पाडणारी .. सारी घरे एकाच इमारतीत. ती ही एकाच विंगमध्ये.. एकावर एक. तिसऱ्या मजल्यावरच्या शास्त्रींना सावध राहण्यास सांगितले पाहिजे .. त्यांच्या खिडकीवर नजर ठेवली पाहिजे.

वागळेंचे विचार चक्र सुरू होते..

रात्री दमूनभागून वागळे घरी आले. जवळच त्यांचा छोटा मुलगा कालच त्याच्या वाढदिवसाला मिळालेल्या खेळण्यांनी खेळत होता. एकाएकी त्यांच्या पायाला काहीतरी जाणवले ..

"बाबा.. हँड्स अप.. माझा नवीन रोबो.."

घाबरल्यासारखे करीत त्यांनी हात वर केले. मग त्या रोबोच्या करामती दाखवण्यात मुलगा गुंग झाला.

एकाएकी त्यांच्या मनात विचार आला .. चोरी करणारा कुणी रोबो तर नसेल? इतका प्रगत रोबो? इतका प्रगत आणि ॲडवान्स रोबो..? छोटासा असेल तर खिडकीतून आत शिरेल. पण वर चढेल कसा? हवेत उडणारा असेल कि ड्रोनमधून उडत येणारा? की उडवला जाणारा?  उडवला जाणारा.. म्हणजे

त्याचा कंट्रोल? तो जवळपास कुठेतरी असायला पाहिजे .. रात्रभर मनात विचार चक्र सुरू होते..

सकाळी इन्स्पेक्टर वागळे उठून कामावर निघाले तर रात्रीतल्या त्या विचारांची त्यांना गंमत वाटली. सिनेमात काहीही दाखवता येते. सत्यात ते तसे होतेच असे थोडीच आहे? शास्त्रींच्या खिडकीखाली पहारा बसवण्याचा निर्णय घेऊन ते पोलीस स्टेशनात पोहोचले.

दुपारच्या कामातून सवड मिळताच वागळेंचे लक्ष परत त्याच रात्रीतल्या विचारांकडे वळले. रोबो .. तो ड्रोनमधून येणारा आणि खिडकीतून शिरणारा.. ड्रोन मधून असेल तर रात्री ड्रोन उडण्याचा आवाज यायला पाहिजे. की ॲडवान्स्ड रोबॉटिक्स मध्ये येत ही नसेल. त्याचा कंट्रोल कुठेतरी जवळच .. काय हरकत आहे? थियरी मांडायला? नाहीतरी केसमध्ये धागेदोरे नाहीतच काही..

इन्स्पेक्टर वागळेंची गाडी परत त्या इमारतीत पोहोचली. रहिवाशांना 'पोलिस तपास सुरू आहे' छापाची उत्तरे देत ते

कामाला लागले परत. रिमोट कंट्रोल असेल तर तो समोरच्या इमारतीतून चालू असावा? त्यांनी नीट निरखून पाहिले. समोरच्या इमारतीत तीन मजल्यावरच्या सहा खिडक्या आणि ह्या इमारतीतील हे तीन मजले .. दूर असले तरी समोरासमोर होते..

तीन आठवडे उलटून गेलेले. आजवर कसला पत्ता लागत नाही. रहिवासी पण कंटाळून गेले. शास्त्रींच्या खिडकीखालचा पोलिस पहारा उठवला गेला. इन्स्पेक्टर वागळेंना त्यांच्या सीनियर्सकडून चांगलीच तंबी ही मिळाली. पण तंबी मिळून कामे थोडीच होतात? पूर्ण डिपार्टमेंट त्यांच्या त्या रोबोटिक चोरीच्या थियरीवर हसले. चोरीची ही केस जणू थंड बस्त्यात पडली.

रात्रीची वेळ. तो शास्त्रींच्या उघड्या खिडकीतून आत शिरला. समोर कपाट. त्याची उंची सरसर वाढत गेली. कपाट उघडले तर आत लाल रंगाच्या दागिन्यांच्या दोन पेट्या. नोटांच्या व्यवस्थित लावून ठेवलेल्या थप्प्या. त्याने सगळे

हातात घेतले. काही मिनिटांत काम संपवून तो खिडकीत पोहोचला. क्षणात त्याची उंची कमी झाली. खिडकीतून तो बाहेर पडला..

शास्त्रींच्या बेडरूममध्ये दडवून बसवलेल्या कॅमेरात रेकॉर्ड झालेली टेप पोलिस स्टेशनात बघता बघता इन्स्पेक्टर वागळेंच्या चेहऱ्यावर हसू फुटले. रोबोने चोरी केली.. खरेतर रोबोकडून चोरी करवून घेतली गेली.. इथपर्यंत माग लागला होता. आता त्या रोबोमागचा करविता धनी फक्त शोधणे आले.

शास्त्रींकडच्या, खरेतर घडवून आणलेल्या, चोरीने अजूनच खळबळ माजली. चार वेळा चोरी झाली. एकाच पद्धतीने. एकाच इमारतीत. पोलिसांना पत्ता लागत नाही म्हणून टीकेची झोड उठली. इन्स्पेक्टर वागळे शांतपणे प्रश्न टोलवत होते. त्या करवित्या हातास चुकूनही संशय न येता पुढचे काम करायचे होते.. खोटे दागिने आणि खोट्या नोटांची पुडकी गेली .. शास्त्रींना विश्वासात घेऊन सारे काही गुपित राखले गेले.

समोरच्या इमारतीत तीन जणांच्या खिडक्या. ह्या इमारतीतल्या खिडकीतून लपूनछपून रिमोट कंट्रोलने एखादा रोबो ऑपरेट करता येऊ शकेल.. विज्ञानाने झेप घेतलीही आहे इतकी. त्याचा फायदा करून घ्यायचा की गैरफायदा हे वापरणाऱ्यावर अवलंबून. तळमजल्यावर जोशी राहतात. ऐंशीच्या घरातले आजोबा नि तशीच म्हातारी आजी. त्यांच्याकडून असले काही घडणे अशक्य. वरची दोन्ही घरे बंद होती त्या दिवशी. पहिल्या मजल्यावर मल्होत्रा बाई राहतात. एकट्याच. त्या कॉलेजात इंग्रजीच्या प्रोफेसर आहेत. त्यावर राहणारे सतीश मिश्रा. ते इलेक्ट्रिकल इंजिनियर. म्हणजे हे काम त्यांच्याकडून होण्याची शक्यता आहे. चोरीच्या दिवशी मात्र दोन्ही घरे बंद..

इन्स्पेक्टर वागळेंच्या विचारांची गती वाढली अचानक. रिमोट कंट्रोल आणि त्याच्याने ऑपरेट केला जाईल असा प्रगत रोबो.. आजवर फार काही जणांना जमेल असे नाही हे. म्हणजे त्यात असणारे तज्ञ थोडेफारच असणार. म्हणजे शोध घ्यायचा तो रोबॉटिक्समधले तज्ञाचा.

वागळेंचा शाळेतील दोस्त.. डॉ. चित्तरंजन साळवी. आय.आय.टी.तला स्कॉलर. शाळेपासूनच अत्यंत तल्लख बुद्धीचा. वागळेंना त्याची आठवण आली. त्याच्याकडून ही माहिती मिळणे शक्य होते..

वागळेंनी फोन लावला,

"हॅलो, इन्स्पेक्टर वागळे हियर .. कॅन आय स्पीक टू डॉ. साळवी?"

कुण्या पोलिसाचा फोन आला की जशी तंतरते तशीच हालत डॉ. साळवींची झाली..

"येस.. स्पीकिंग.."

"चित्या .. साल्या साळवी .. ओळख विसरलास?"

"ओहो.. वागळे. अरे साधी माणसं आम्ही.. पोलिसांचा फोन आला तर घाबरणार नाही कोणी?"

"अरे कर नाही त्याला डर कशाला?"

"ओके मराठी स्कॉलर.. बोल काय काम काढलेस?"

इन्स्पे. वागळेंनी सारी कहाणी सांगितली.. पुढे काही विचारण्याच्या आत साळवी बोलले, "एकच माणूस आहे देशात समज.. हू इज केपेबल. दी वर्ड इन रोबोटिक्स .. डॉ. सुधीर श्रीवास्तव.. मी व्यक्तिशः नाही ओळखत पण असल्या करामती इज हिज फोर्टे. आणि त्याने आता फ्लाइंग रोबो बनवायला घेतला असणार .."

"पण त्याला क्रिमिनल बॅकग्राउंड आहे?"

"आय डोन्ट नो.. मी ओळखत नाही, पण शोध. आय थिंक युवर सर्च विल बी ओव्हर वन्स यू फाइंड हिम."

"ओके. अरे या केसेसनी माझे केस पांढरे व्हायची वेळ आलीय.. थ्यांक्स."

शेवटी शोध लागलाच म्हणत इन्स्पेक्टर वागळे कामाला लागले. डॉक्टर श्रीवास्तवांचा शोध मात्र वाटला त्याहून कठीण होता.. दुसऱ्या मजल्यावरच्या मिश्रांचा संबंध तर शोधूनही सापडेना. मल्होत्रा बाईंचा संबंध? त्याबद्दल काहीच माहिती मिळेना. नाही म्हणायला बाईंकडे मध्येच कुणीतरी येत असते एवढी माहिती मिळाली. पोलिस तपास म्हणून त्यांच्याही

घराचा तपास झाला. त्यात काही मिळेना .. इन्स्पेक्टर वागळे पुढे काय म्हणून डोके खाजवित पोलिस स्टेशनात बसलेले .. त्यात पोलिस स्टेशनात नवनवीन केसेसची भर पडतच राहते. पण ही केस वागळेंच्या डोक्यातून जाईना. परत ती चोरीची रेकॉर्ड लावून ते बसले. आणि त्यात गुंग असताना शिपायाने वर्दी दिली..

"साहेब, बाहेर कुणी श्रीवास्तव आलेत. अर्जंट भेटायचेय म्हणतात."

"कोण?"

"कुणी डॉ.सुधीर श्रीवास्तव आहेत.."

इन्स्पेक्टर वागळे ताडकन् उठून उभे राहिले. चाळीशीतील मध्यम उंचीचे पण एखाद्या स्कॉलरसारख्या लुकचे डॉ. श्रीवास्तव आत येत म्हणाले,

"इन्स्पेक्टर वागळे .. आय हॅव टू कन्फेस .. अर्थात गुन्ह्याबद्दल नाही. कारण मी केलेला तो प्रयोग .. यशस्वी प्रयोग म्हणा .."

वागळे आ वासून बघत असतानाच श्रीवास्तवांनी सगळा मुद्देमाल समोर मांडला. चार वेगवेगळ्या पॅकेटमध्ये व्यवस्थित लावून वर नावाची लेबल्स लावलेली ..

"सॉरी, तुम्हाला खूप त्रास दिला .. पण धिस वाॅज पार्ट ऑफ माय रोबोटिक्स एक्सपरिमेंट्स.. आणि सारे प्रयोग यशस्वी झालेत. नाऊ माय रोबो कॅन फ्लाय.. पायपावर चढतो, उतरतो तो.. इट कॅन जज द हाईट आणि आपली उंची ॲडजस्ट करतो तो. कुणी आले जवळ तर तो लपतोही.. तो उड्या मारू शकतो.."

"ओह..!"

"शेवटच्या प्रयोगात मात्र फसलो मी.. म्हणजे तुमच्या सीसीटीव्हीचा अंदाज त्याला नाही आला.."

समोरच्या लॅपटाॅपवर कॅसेट सुरू होती ती पाहात श्रीवास्तव म्हणाले.

"आणि खोट्या दागिन्यांचा.. नि नोटांचाही .."

"ओह! शेवटच्या चोरीत सारे खोटे दागिने होते? मी उघडून पाहिले नाहीत अजून .. बट देन दॅट्स अनदर फेल्युअर.. रोबोज ना खरे नि खोटे ओळखता यायला हवेच. आम्ही रोबोज

इव्हॉल्व्ह करतोय ..म्हणजे ते कुठे नि कसे वापरता येतील त्याचा शोध घेतोय. बट आय मस्ट अॅडमिट.. तुम्ही हुशार आहात. यू हॅड ऑल्मोस्ट क्रॅक्ड द केस .."

"म्हणजे रोबोटिक्सचा चोरीसाठी वापर .."

"नो नो.. इन्स्पेक्टर. धिस इज नॉट दॅट सिंपल. अर्थात चुकीच्या हाती लागले तर डिझास्टर. बट यू गाॅट इट.."

"थ्यांक्स.. पण तुम्ही पकडले गेला असतात तर कोणी विश्वास ठेवला असता तुमच्यावर? म्हणजे मी तरी नाही .."

"दॅट्स अनदर स्टोरी! अँड आय मस्ट कन्फेस .. देअर आर फ्यू पार्टनर्स इन क्राईम हिअर!"

"म्हणजे? आणि क्राईम ..?"

"नावे ऐकायची आहेत? सगळ्यात प्रथम तुमचे मित्र डॉ. साळवी.. त्यानंतर तुमचे एसीपी हळदणकरसाहेब.. हे कमी म्हणून की काय.. त्या इमारती शेजारच्या इमारतीतला वाॅचमन नरबहादूर थापा.. इन्स्पेक्टर वागळे, यू आर लकी.."

"मी? आणि लकी?"

"यस. हळदणकर साहेब नि साळवीसर दोघे माझे मित्र आहेत. एकदा भेटलो होतो आम्ही तिघे, तर हळदणकरसाहेबांनी तुमची खूप स्तुती केली. म्हणाले ही इज द बेस्ट ब्रेन इन द इन्व्हेस्टिगेशन्स.. एखाद्या सीनियरचा इतका विश्वास मिळवलाय तुम्ही .. दॅटस् व्हाय आय सेड.. यू आर लकी. तर टू प्रूव्ह द पाॅईंट तुमची परीक्षा घ्यायचा प्लॅन होता आणि त्यात माझा स्वार्थ होतात. चढणारा, उडणारा रोबो नि स्वतःच स्वतःला मॅनेज करणारा रोबो.. नाईंटी पर्सेंट यशस्वी."

"साळवी तर म्हणाला तो ओळखत नाही तुम्हाला .."

"ते उगाच. बट ही डीड गिव्ह माय नेम.. तुम्ही रोबोटिक चोरी पकडलीत.. ही वाॅज इम्प्रेस्ड.. आज न उद्या माझ्यापर्यंत पोहोचलाच असतात इन्स्पेक्टर वागळे. इट वाॅज अॅन एक्सपरिमेंट.."

"अॅन एक्सपरिमेंट नाही .. टू इन वन! एक तो रोबोवर नि दुसरा माझ्यावर केलेला."

"येस.. मी रोबोज विदाऊट रिमोट कंट्रोल कसे वागू शकतात हे पाहात होतो."

"म्हणजे चोरी रोबोने स्वत: केली.."

"अर्थातच. त्यासाठी त्याचे प्रोग्रामिंग केले गेले. पण घरात शिरण्यापासून बाकीचे सारे त्याचे त्याने मॅनेज केले. मी फक्त नरबहादूरच्या केबिनमध्ये बसून त्याची वाट पाहात होतो."

"म्हणजे त्या रोबोचा करविता धनी?"

"मी. करविता धनी मी होतो ही.. आणि नव्हतो ही!"

## *व्हर्च्युअल रिॲलिटी!*

सहाच्या ठोक्याला सोनावणेबाई उठल्या. नेहमीप्रमाणे. इतक्या वर्षांची सवय त्यांची. सकाळची शाळा. आठवाजेतोवर सर्व आवरून शाळेत जायचे. साडेचारला घरी. गेल्या दोन वर्षात यात बदल झालेला. हेडमिस्ट्रेस म्हटल्यावर कामे पण जास्त असणारच. त्यामुळे अजून लवकर जायला लागायचे. बाई हाडाच्या शिक्षिका. त्यामुळे हेडमिस्ट्रेस झाल्या तरी मुलांचे वर्ग घेणे काही कमी केले नव्हते. भौतिकशास्त्र त्यांचा हातखंडा विषय. समजायला कठीण म्हणून मुलांना शिकवायला अजूनच मजा यायची त्यांना. शेवटच्या बाकावरच्या शेवटच्या मुलाला संकल्पना कळेतोवर त्या शिकवायच्या. हवेचा दाब, गुरूत्वाकर्षण नि आर्किमिडिजचा सिद्धांत.. न्यूटन नि गॅलिलिओ मंडळी नसती तर जगाचे काय झाले असते? भौतिकशास्त्र म्हणजे अर्धे गणित. तो त्यांचा आवडता विषय. त्यामुळे मोठया रंगात येऊन त्यांचे शिकवणे चाले. सगळी मुलं

त्यांच्या शिकवण्यावर खूश होती. सोनावणेबाईंचा तास म्हणजे पोरं भौतिकशास्त्राचाही अभ्यास करायला राजी असायची. इतर विषयांना असले शिक्षक का मिळू नयेत त्यांना? अगदी पीटीच्या तासाहूनही बाईंचा तास आवडायचा त्यांना.

बाई होत्याच तशा. पस्तीस वर्षे एकाच शाळेत शिक्षिका होत्या. मुलांच्या कित्येक बॅचेस हाताखालून गेलेल्या. अगदी पहिल्या बॅचेसच्या विद्यार्थ्यांची मुलेही त्यांच्या शाळेत येताना पाहिलेली. आणि त्यांचे आता पालक झालेले विद्यार्थी अजूनही आठवण काढतात त्यांची.

आज साडेआठाला बाई आपल्या खुर्चीत बसल्या. समोर विद्यार्थी बसलेले दिसले आणि त्यांची कळी खुलली. ही पद्धत थोडी नवीन होती. पण नेहमीप्रमाणे त्यात मुलांचा आवाज होता. त्यांची बडबड होती. खोड्या होत्या. कुणी हळूच पाणी पितो चोरून. कुणी लपवून लपवून डब्यातून काही तोंडात टाकतो. कुणी बाईंची पाठ वळताच काहीतरी बोलून आपण काहीच केले नाही असे तोंड करून साळसूदपणे बसतो. बाईंचा तास असला तर मात्र त्यांच्या मुलांना असले काही सुचत नसे

जास्त. पण तरीही इतक्या वर्षांत इतकी मुलं हाताखालून गेलेली. त्यात ही गंमत असते. एकेक मूल मोठे होत जाताना पहायची गंमत. आणि त्यात आपला हातभार लागल्याचे समाधान ही. अगदी शाळेतल्या सारखाच नसला तरी समोर विद्यार्थी वर्ग तर होताच. मुलं एका जागेवर बसून होती. आज बाईंना पहिला चौथा नि सातवा पिरीयड घ्यायचा होता. मध्ये बाई मोकळ्याच होत्या. पण तीन तास शिकवायला मिळेल म्हणून बाई खूश होत्या.

बाजूच्या खोलीतून केतन सारे पाहात बसला होता. पहिलाच पिरीयड सुरू झाला. त्याच्या मोबाईलवरून शाळेतल्या तास सुरू होण्याची घंटा त्याने वाजवली. बाईंनी तास सुरू केला ..

केतननी सांगितलेल्या गोष्टी लक्षात होत्या त्यांच्या.

"आई, हा वर्ग थोडासा वेगळा आहे. हा चष्मा फक्त घालावा लागेल काळा. मग वर्ग सुरू. समोर मुलं असतील. तू

बोल. ती पण बोलतील. हजेरी घे. आणि शिकव तुझा तास संपेल तोवर."

"चष्मा कशाला?"

"तू घाल फक्त. मग कळेल तुला."

"पण शाळेत जायला नको मला?"

"तू नाही जाणारेस. शाळाच येईल तुझ्याकडे. बघशील तू.."

केतन म्हणाला तसेच झाले. घंटी वाजली नि बाईंनी चष्मा चढवला डोळ्यांवर. समोर शाळेचा वर्ग होता. मुलं होती. नववी ब चा वर्ग. मुलं ओळखीची नव्हती वाटत. शाळेतली सगळी मुलं बाईंच्या ओळखीची. नाव आणि आडनावासकट. ही मुलं कोण?

बाईंनी मग पहिला तास सगळ्यांचे नावगाव विचारण्यात घालवला. कोणाला काय आवडते, कोण खेळतो चांगला आणि कोण लिहितो, गातो वगैरे छंदांची माहिती घेतली.

मुलं नवीन होती पण बाईंच्या बोलण्याने ती पण खूश झाली. एक पिरीयड संपला. बाई थोडावेळ मोकळ्या झाल्या. चष्मा काढून घरातल्या कामात दंग झाल्या.

नंतर चौथा पिरीयड.. सातवा पिरीयड पण झाला. बाई आज प्रसन्न दिसत होत्या.

"कशी झाली शाळा आई?"

"छान. पोरं खूप गोड आहेत रे. मस्तीखोर आहेत काही पण पोरं नाही तर कोण मस्ती करणार. उद्या परत शाळेत जायची वाट पाहातेय मी.. नाही, शाळा माझ्याकडे येण्याची वाट पाहतेय मी.."

आठवडा गेला. सोनावणे बाई आपल्या शाळेत रूळल्या. मन लावून शिकवत होत्या. विषय तर त्यांचे अगदी तोंडपाठ. सगळे पुस्तकातले धडे तोंडपाठ. मुलांना शिकवले की समाधानाने बाई घरातल्या कामांना लागत.

"एकच आठवडा.. आठवड्यापूर्वी आणि आता जमीन अस्मानाचा फरक आहे डॉक्टर .." केतन डॉ. भाटवडेकरांना सांगत होता..

"माझा विश्वासच बसत नाही डॉक्टर .."

"छान. म्हणजे आपली योजना सफल होतेय म्हणायची .."

"अगदीच.."

"त्यात तुमची मदत मोलाची केतन. तुम्ही या फिल्डमधले नसता तर मी हे प्रत्यक्षात करू नसतो शकलो.. यू हॅव एक्सीडेड माय एक्स्पेक्टेशन्स.. एवढी रियालिटी.. व्हर्च्युअली तयार करणे.. साऊंड्स इम्पाॅसिबल.. आणि आपल्या पेशंटला त्याचा चांगलाच फायदा होतोय.. गुड.."

एक महिन्यापूर्वी केतन आपल्या आईला घेऊन आला क्लिनिक वर. सायकियाट्री क्लिनिक म्हणजे कुणी वेड्यांचा बाजार म्हणतो त्याला. डॉ. भाटवडेकर आपल्या क्षेत्रातले नावाजलेले तज्ञ. सोनावणेबाई रिटायर होऊन सहा महिने होऊन गेलेले. बाई आधी अगदी व्यवस्थित होत्या. रिटायर झाल्या नि विचित्र वागू लागल्या. तासन् तास भिंतीकडे पाहून बोलू

लागल्या. झोपेतून उठून मुलांना नोट्स दिल्यासारखे बोलू लागायच्या. सकाळी उठून तयारी करून बसायच्या. पुस्तके हाती घेऊन खूप वेळ नुसतीच पाने उलटत बसायच्या. बाईंचा विचित्रपणा वाढत चाललेला. दिवसेंदिवस विक्षिप्तपणा.. विचित्रपणा कुणी वेडेपणा म्हणावा अशा सीमेवर पोहोचताना दिसत होता. डॉक्टरांनी संपूर्ण गोष्ट ऐकून घेतली. बाईंच्या पस्तीस वर्षे शिकवण्याचा संबंध असावा त्यांच्या वागण्याशी इतपत निष्कर्षाला ते पोहोचले..

"केतन, तुम्ही चार दिवसांनी एकटे या.. मी केस ॲनालाइज करतो. लेट्स् सी व्हॉट बेस्ट आय कॅन डू फाॅर माय टीचर.."

"तुमची टीचर?"

"येस.. आय प्राऊडली से, मी सोनावणे बाईंचा विद्यार्थी आहे म्हणून. तात्पुरत्या ह्या गोळ्या घ्या. पण मला वाटतेय आय नो व्हॉट शी नीड्स.. तुम्ही या परत."

चार दिवसांनी केतन डॉक्टरांसमोर बसलेला..

"डॉक्टर, त्या गोळ्यांनी आई थोडी शांत झाली पण डोळ्यातला जिवंतपणा दिसत नाही.."

"हे बघा, केतन, मी विचार केलाय. तुमची आई एक डेडिकेटेड टीचर होती. आय नो हर.. कारण मी त्यांचाच विद्यार्थी. बाईंचा हा अवतार झालाय म्हणून नाहीतर स्कॉलर्सच्या बॅचचा विद्यार्थी म्हणून मला ओळखलेच असते त्यांनी. आमच्या सगळ्या शाळेतल्या सगळ्यांच्या सगळ्यात आवडत्या शिक्षिका होत्या त्या. आज शाळा सोडून इतकी वर्षे झाली तरी वुई रिमेंबर हर.. शाळेच्या रियुनियनला अजूनही त्यांची आठवण काढतो आम्ही. आय थिंक शी इज डेस्परेटली मिसिंग हर स्कूल .."

"पण आई रिटायर झालीय.."

"तेच. शी इज मिसिंग स्कूल.."

"पण मग?"

"हे बघा, शी नीड्स टू कंटिन्यू टीचिंग.."

"म्हणजे खाजगी क्लासेस मध्ये .."

"नो.. केतन. त्यांना परत आपल्या शाळेत शिकवायला जायला पाहिजे .."

"पण डॉक्टर हाऊ इज इट पाॅसिबल? आफ्टर शी हॅज रिटायर्ड?"

"माझ्याकडे एक कल्पना आहे. लहान मुलांच्या गेममधली.. तुमच्या ओळखीत कुणी व्हर्च्युअल गेम डिझायनर आहे?"

"खरं सांगू सर, मी स्वतःच सॉफ्टवेअर मध्ये आहे.. आय थिंक यू आर रिफरींग टू व्हर्च्युअल रिॲलिटी.."

"यस, यू आर टू शार्प. मी काय सांगणार ते तुमच्या आधीच आलेय ध्यानात.."

"यस. मी आताच इमॅजिन करतोय तुम्हाला हवे तसे.. मी सांगतो व्हॉट आय कॅन मॅनेज. मग त्यात काही ॲडिशन्स असतील तर सांगा सर.."

"यस.. ब्रिलियंट मॅन. गो अहेड."

"सर मागे एक गेम आलेला, पोकेमाॅन गो. दॅट वाॅज ऑगमेंटेड रिॲलिटी. म्हणजे त्यात आजूबाजूला नेहमीच्या

गोष्टींत इंट्रोड्यूस केलेल्या काँप्युटर इमेजेस दिसायच्या. आपण त्यापुढे जाऊ. इट वुड बी व्हर्च्युअल रिॲलिटी.. म्हणजे आई समोर ॲक्च्युअल क्लासरूम असेल, ॲक्च्युअल मुलंमुली असतील. आईला ते सारे शाळेच्या वातावरणात घेऊन जाईल. शी वुड बी कट फ्रॉम रिॲलिटी इन दॅट टाइम.. आर्टिफिशियल इंटलिजन्स वापरून आपण मुलांना रिॲक्ट करायला शिकवू शकतो. म्हणजे शिकवणे एक रियल लाईफ अनुभव होईल तिच्यासाठी. व्हर्च्युअल असला तरीही. आणि तुम्ही म्हणता तोच प्रा ॅब्लेम असेल तर एकदा ती परत मुलांत मिसळली की नॉर्मल होऊन जाईल.. आय होप."

"वा! तुम्ही इन नो टाइम सगळे डिझाईन पण करून टाकलेत.. आय थिंक दॅट शुड सॉल्व्ह हर प्रा ॅब्लेम."

"तुम्हाला वाटते तसे सर?"

"यस, लेट्स् होप फा ॅर बेस्ट. तुम्ही कामाला लागा. किती दिवस लागतील तुम्हाला ह्यासाठी?"

"जास्त नाही सर, एक आठवडा. त्यानंतर मी तिला तयार करतो या व्हर्च्युअल क्लासरूम साठी."

"ग्रेट. लेट्स् होप फा ॅर द बेस्ट. तोवर गोळया सुरू ठेवा.."

"यस डॉक्टर. आय विल गेट बॅक टू यू."

सोनावणे बाई आता दररोज शाळेत जाऊ लागल्या. खरेतर शाळाच त्यांच्या घरात येऊ लागली. बाई सकाळी शाळेचे पिरीयड घ्यायच्या.. सर्व मुलांशी हसून बोलायच्या. त्यांना हवे ते मिळाले आता. बाकी घरात सगळयांशी मिळून मिसळून वागायच्या. त्यांची शाळा आभासी का असेना, पण त्यांच्यासाठी सत्यात आली होती. सत्यातल्या शाळेतून रिटायर व्हायला लागते, ह्या व्हर्च्युअल शाळेत त्या हवी तितकी वर्ष शिकवणार होत्या!

.. हीच त्यांच्यासाठी आता रिॲलिटी आहे!

## *अधांतर !*

टिंग टॉंग...

बेल वाजली..

'आलात?'

'यावे..यावे !'

'यमसदनात आपले स्वागत आहे..कृपया प्रतीक्षा करा..'

मागून रेकॉर्डेड आवाज येऊ लागले..

'आपला वेळ किंमती आहे..वाट पाहिल्याबद्दल धन्यवाद..'

मध्येच जाहिरातीचा सूर..

'इंद्रलोकाच्या वास्तव्यासाठी एकच ठिकाण..अमरावती..सर्व सुखसोयींनी युक्त..अमरावती..'

टिंग टॉंग..

'कृपया वाट पहा..आपला वेळ किंमती आहे..आमची सारी वाहने व्यस्त आहेत..'

परत जाहिरात..

'प्रिय आमुचा एक स्वर्ग देश हा...लगेच बुक करा..स्वर्गसफर टूर्स आणि ट्रॅव्हल्स..'

'वाट पाहिल्याबद्दल धन्यवाद..लवकरच आम्ही तुमच्या सेवेत हजर होऊ..प्रतीक्षेबद्दल धन्यवाद..रांगेचा फायदा तुम्हाला आम्हाला.. सर्वांना.. आपला क्रमांक येण्याच्या बेतात आहे.. कुर्सीकी पेटी..क्षमस्व.. आपल्याला प्रतीक्षा करावी लागली त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत..कृपया आम्हाला सहन करा..'

सगळ्या घोषणांनी मी चांगलाच गोंधळलो. अर्थात मी कधी इथे आधी आलो होतो असे नाही..

परलोकातील हा पहिलाच प्रसंग नि अनुभव.. पण त्या शेवटच्या bear with us च्या 'आम्हाला सहन करा'च्या अनुवादानी तशाही स्थितीत डोक्यावर हात मारून घेतला असता.. शक्य असते तर.. मराठीचे धिंडवडे.. इथेही.. bear

with us म्हणजे आम्हाला सहन करा? हाडाचा शिक्षक मी.. आता निश्चेष्ट अवस्थेत हे सहन करण्यावाचून काही पर्याय पण नव्हता ना..

परत मागून आवाज सुरू झाला..

‘आमची सर्व वाहने इतर यात्रेकरूंना घेऊन गेली आहेत..कृपया वाट बघा किंवा आपण थोड्यावेळाने परत प्रयत्न करू शकता..’

मी त्या तशा अवस्थेतही गडबडलो. परत या म्हणजे? मी हातपाय हलवायचा प्रयत्न केला. थोड्या पापण्या हलवून पाहिल्या..काहीच हलेना..मग परत या म्हणजे काय?

परत जाहिराती सुरू..

‘सुंदर झरे..सुंदर घरे..एकमेव तरीही माफक..न्यू हेवन्स.. नदीकिनारी आपले हक्काचे घर..विसरू नका..न्यू हेवन्स..!’

‘कृपया प्रतीक्षा करा.. वाट पाहिल्याबद्दल धन्यवाद.. आपण रांगेत आहात..’

‘कोण म्हणतो नरक नरक आहे? समस्याओंसे परेशान.. हमारे पास है समाधान..जय बाबा नरकासुर.. एकदा अवश्य खात्री करा..'

'कृपया प्रतीक्षा करा.. या रूटवरची सर्व वाहने व्यस्त आहेत..’

‘शंभर टक्के यशाची हमी.. नरकातून स्वर्गात प्रवेश.. कायदेशीर सल्ला.. लगेच भेटा.. का.य.दावेदार.. एकच विश्वसनीय नाव..’

‘स्वर्गाला कंटाळलात..? नरकाला भेट.. फ्री एक रात्र.. संपर्क रौरव ट्रॅव्हल्स..’

‘कृपया वाट बघा..’

जाहिरातीचा मारा सुरू..

ही वाट बघा.. कतारवाली भाषा पृथ्वीवरून येताना कोणी एमटीएनएलवाल्याने इथे आणली की इकडून पुनर्जन्मानंतर त्याने पृथ्वीवर आणली असेल? कोण जाणे!

मी शांतपणे कतारमे उभा म्हणजे आडवा राहिलो. एकच होते.. माझ्याप्रमाणे सगळेच निष्प्राण.. त्यामुळे उगाच कोणाची

बाचाबाची नाही की भांडण नाही.. लाईनमें क्या घुसता है वगैरे नाही.. एकूण छान सारे.. त्या गोष्टीपेक्षा त्या जाहिराती मस्त वाटत होत्या. एवढा कल्पनाविलास तर तामिळ सिनेमावाल्यांना पण जमणार नाही. मी पुढच्या जाहिरातींची वाट पाहू लागलो तर सगळीकडे शांतता. मध्येच रांगेची घोषणा..मग जाहिरात आलीच..

'टिंग टॉंग..'

'सफेदीकी चमकार.. वापरा.. श्वेता साबण.. स्वर्गाहून सुंदर.. धवल इंडस्ट्रीचा.. श्वेता साबण...'

मग परत..

'कृपया सहकार्य करा.. आम्हाला सहन करा..'

'नरकापासून मुक्ती..? होय हे शक्य आहे.. नरकातच राहून स्वर्ग सुख.. सुलभ हप्त्यांवर उपलब्ध.. गिरीशंकर एंटरप्रायझेस..'

'नरकात जाताय..? घाबरू नका आम्ही आहोत..'

जाहिरातींवर जाहिरातींचा मारा सुरू.. घोषणा सुरू..

मी चकित झालो असतोही पण त्या अवस्थेत चकित होता येत नाही.. खरे सांगतो.. म्हणजे अनुभवाचे.. खरेतर स्वानुभवाचे बोल ते.

थोडा वेळ गेला नि माझ्यापुढच्या बॉड्या वळून पुढे जाऊ लागल्या.. घोषणा झाली..

‘स्वर्गवाले डावीकडे..नरकवाले उजवीकडे.. कृपया लायनीत यावे..’

माझ्यापुढे तीन जण होते. पहिला स्वर्गाकडे..दुसरे दोन नरकाकडे..

माझे काय होणार..?

शक्य असते तर तशाही स्थितीत मी म्हणालो असतो.. तेरा क्या होगा कालिया? बघेबघे पर्यंत माझ्या नंतरच्या बॉड्याही हलल्या.. मी अडकलो.. आता काय? अधांतरी?

तेवढ्यातल्या तेवढ्यात मी हिशेब मांडायला घेतला. पापे किती? नाही म्हणायला मी अगदीच काही गौ-आदमी नव्हतो. चुकून भाजीवाल्याने जास्त पैसे परत दिले तर साळसूदपणे ते

खिशात घालण्याची लबाडी मी अधेमधे करत ही असे.. आता इथे खोटे कशाला बोला? सांगायचा मुद्दा माझ्या खात्यात अशी पापे असणारच. अगदी लहानपणी चोरलेला खोडरबर वा पेरू.. सोळावर्षांखालील दुष्कृत्ये पापे म्हणून हिशेबात पकडतात की नाही कोणास ठाऊक.. म्हटले ना पहिल्यांदाच इथे पोहोचलेलो.. मग मी जमा पाहू लागलो. तसा मी दयाळू.. मदत करणारा सर्वांना.. शिक्षक म्हणून कितीकांचे आयुष्य घडवले असेन.. आता त्याला किती वेटेज कोणास ठाऊक. मी करतोय हिशेब.. पाप नि पुण्याचा. मला तर वाटतंय.. पुण्यच जास्त.. पण आता काय? मी पाहात राहिलो.. काय होणार माझे.. डावा की उजवा? डावीकडे की उजवीकडे.. की असाच.. अधांतरी?

आता माझे काय नि कसे काय होणार? चिंता काही सुटत नाही मागची. माझ्यामागून आलेले गेले पुढे नि मी लटकतोय.. अधांतरी.

माझे हे असेच..

रेल्वेच्या लायनीत असो की चुकूनमाकून सिनेमाच्या तिकीटाच्या.. नंबर आला की खिडकी बंद! हे मी तिकडे होतो

तेव्हाची गोष्ट.. पण आताही? म्हणजे हे नशीब अजूनही व्हॅलीड राहते?

मी वाट पाहू लागलो.

दुसरे काय करू शकणार होतो मी?

आता त्या मागच्या घोषणा बंद झालेल्या. त्या बंद झाल्या? की मीच त्या एरियातून कुठे बाजूला शिफ्ट झालोय? कोण जाणे. मला आठवले.. बारावीत असताना माझी मार्कशीटच मिळाली नव्हती. मी पास की नापास तेच कळेना. तेच माझ्या युनिव्हर्सिटीच्या परिक्षेत.. तेच आता इथेही? दुर्दैव म्हणावे तर हे दैव पोस्ट्मॉर्टेमही लागू पडते की काय?

आता माझा संयम संपत आला.

देवा.. नि दैवा.. कसले हे खेळ?

मुंबईत सगळी घाईची सवय.. नि इथे नुसताच टाईमपास. गेली बावन्न वर्षे धावाधाव.. रिटायरमेंट.. आता आरामच आराम.. कसली घाई..

भविष्यच अधांतरी म्हणावे तर माझ्यासारख्या डेड बॉडीला भविष्य असू शकते का? सब्र का फल मीठा होता है म्हणत त्या गोड फळाची वाट पाहात बसलो.. म्हणजे पडून राहिलो झाले..

किती वेळ झाला कुणास ठाऊक. आजूबाजूस काही हालचाल नाही नि तशी ती दिसायची लक्षणे ही नाहीत. निर्जन ठिकाणी मी एकटा.. आधी सोबतीला तरी काही बॉड्या होत्या.. आता त्याही नाहीत..

*****

कंटाळून मी जांभई दिली मोठी. झोप येत होती खूप. आता असे होऊ शकते याचाच मला धक्का बसला. हळू हळू थोडे गरम वाटायला वाटायला लागले, अंगातून काही सळसळत गेले. डोक्यात रक्तच पोहोचले जणू. डोळे किलकिले करत मी उघडले..

बाजूला टोप्या नि मास्क घातलेले दोघे तिघे.. डॉक्टर असावेत. त्यांच्या मागे अजून दोघे तिघे..दोन तीन बहुधा सिस्टर्स असाव्यात अजून. म्हणजे हे हॉस्पिटल की काय?

"मी इथे कसा?" मी कसाबसा बोललो. इतक्यात मास्कमागून आवाज आला..

"सिस्टर.. वुई हॅव डन इट.. कॉन्ग्रॅटस डॉक्टर फडके.. कसे आहात मि.कुलकर्णी?"

शेवटचा प्रश्न मला उद्देशून होता!

"मी? आहे? मी ठीक आहे.. पण तो स्वर्ग.. नरक.. ती वेटिंग लिस्ट.."

बोलता बोलता जाणवले माझ्या छातीवर मोठे बॅंडेज आहे..

"म्हणजे.. मी जिवंत आहे..?" मी परत बोललो.

"यु आर सेफ.. अॅंड आऊट ऑफ डेंजर.." एक डॉक्टर बोलले.

"लवकरच तुम्ही घरी जाल तुमच्या.. इटस ए ब्रेकथ्रू.."

म्हणजे काय असावे? असेल काही.. माझ्या पापण्या परत जड झाल्या...

दुसरा की तिसरा.. कदाचित चौथा दिवस असेल. त्या दिवशी डॉक्टर आले तेव्हा मी जिवंतही होतो नि शुद्धीतही.. आणि जागा पण..

"गुडमॉर्निंग, मिस्टर कुलकर्णी.."

"मॉर्निंग सर.." मी हळूच बोललो.

"सिस्टर ऑल इज वेल.. बीपी..?"

"सर, सगळे पॅरामीटर्स ठीक"

"डॉक्टर एक विचारू?" मी कसाबसा म्हणालो..

"मिस्टर कुलकर्णी.. सगळ्या गोष्टी नंतर.. अजून काही दिवसांनी.. अगदी डिटेलमध्ये.. आता जस्ट रेस्ट.. ठीक व्हा मग."

अजून आठएक दिवस गेले असावेत. आयसीयूतून मी वॉर्डात आलो आज. नाकात नळी, हात नि मानेवर सुया. असे

असले तरी बराच ताजातवाना होतो.. दोघे डॉक्टर्स.. एक डॉक्टर भरूचा नि दुसरे फडके डॉक्टर.. सकाळ सकाळी यायचे, सिस्टर पहारा दिल्यासारख्या आजूबाजूला चोवीस तास. मिनीटामिनीटांचा रेकॉर्ड ठेवताहेत जणू. वॉर्डात आलो तेव्हा मी हिला स्वर्ग- नरक वगैरेबद्दल बोललो. मला अगदी स्पष्ट आठवत होते ते.

ही म्हणाली, "नको तो विषय..भास असणार ते.. जवळजवळ आशाच सोडली होती आम्ही. त्या दंगलीत गोळी लागली तुम्हाला.. वाटले संपले सारे.."

हिच्या डोळ्यांना धारा लागलेल्या.

ते पाहून मी विषय सोडून दिला तिथेच. तरी मला त्या रस्त्यावर झालेली दंगल आणि पळापळ आठवत होती अंधूकशी. त्यात गोळीबार झाला असावा आणि गोळीने घेतला असावा माझा प्राण.. नाही.. आता मी जिवंत आहे तर..अगदी कंठाशी आणून ठेवला असावा.

दुसऱ्या दिवशी मी उठून बसलो होतो सकाळी. छातीवर बॅंडेज पण होते .. पण एकूण हुशारीत होतो मी डॉक्टर राऊंडला आले तेव्हा.

"गुड मॉर्निंग सर.."

"मॉर्निंग..काय कसे आहात मि. कुलकर्णी?" डॉक्टर भरूचा बोलले.

इतक्यात डॉक्टर फडके म्हणाले, "आणि कॉंग्रॅट्स, मि.कुलकर्णी. तुम्ही जगातला विक्रम केलाय, तुम्हाला कल्पना नसेल.."

"सर म्हणजे?"

दोघे डॉक्टर्स समोरच्या खुर्च्यांवर बसले. डॉक्टर फडके म्हणाले..

"ऐका.. सांगतो"

दोघांनी आलटून पालटून सांगायला सुरूवात केली..

जे त्यांनी सांगितले ते असे होते..

"तुम्हाला आणले तेव्हा तुम्ही ऑलमोस्ट मृतवत होतात. छातीत लागलेली गोळी.. रक्त वाहतेय.. ना नाडी ना

ब्लडप्रेशर.. मग आम्ही एक निर्णय घेतला. अशा गंभीर जखमांत पेशंट वाचण्याची शक्यता जवळपास शून्य. तेव्हा आम्ही केले काय ना..की प्रथम तुमच्या मेंदूला झोपवले.. म्हणजे गोठवले, अति थंड सलाईन त्याच्यापर्यंत पोचवून.. या तापमानात मेंदू निष्क्रीय होतो. त्याची प्राणवायूची गरज नाहीशी होते.. हळूहळू सर्व शरीराच्या पेशी गपगार होतात. त्यांना ना प्राणवायूची गरज ना रक्ताची. म्हणून रक्त काढून आम्ही थंडगार सलाईन खेळवले सर्व शरीर भर. या सगळयात मेंदूला लवकरात लवकर झोपवणे महत्वाचे. कारण नाहीतर तो चार पाच मिनिटांतच प्राणवायूविना निकामी होऊ लागतो. हेच सगळ्यात आव्हानात्मक. मग बाकी शरीरातील पेशी पण त्या अतिशीत तापमानात झोपून जातात. मग आमच्या हाती काही तास असतात.. तेवढया वेळात आम्ही तुमचे ऑपरेशन केले. सगळे रक्त काढून.. मग ते सगळे रक्त सर्व उरकल्यावर तुमचे तुम्हाला परत.."

"डॉक्टर हे फारच इंटरेस्टींग आहे.."

"हूं.. इंटरेस्टींग आणि आव्हान पण.. जवळजवळ मृतप्राय शरीरात प्राण ओतायचा..त्यासाठी त्याची सारी मेटाबॉलिझम.."

"म्हणजे चय-अपचय क्रिया.." डॉक्टर फडक्यांनी मराठीत भाषांतर केले.

"तर सगळी मेटाबॉलिझम बंद पाडायची..त्यात ऑपरेशन संपवायचे.. पण या मेहनतीचे फळ दिसतेय.. त्यातही मेंदूला हानी न पोहोचू देणे महत्वाचे आणि कठीण. जगात तुम्ही पहिलेच असे..

आणि सामान्य परिस्थितीत हे आम्ही नाही करू शकत पण ज्या अवस्थेत तुम्ही आणले गेलात त्यात याशिवाय दुसरा पर्यायही नव्हता.. आजवर असली सर्जरी कुणी केली नसली तरी काही प्रमाणात अशी रिस्क घेऊन ऑपरेशन करायला आम्ही तयार झालो. नशिबाने तुमच्या नातेवाईकांनी हिरवा सिग्नल दिला.. आणि.."

"यांचा पुनर्जन्म झाला म्हणा डॉक्टर" ही मध्येच म्हणाली.

"सर, मी काय.. सगळे तुमचेच श्रेय.. हे सगळे एका स्वप्नासारखे वाटतंय..पण मी एक विचारू.. म्हणजे तुम्ही थोडे फ्री असाल तर.."

"ओह मि.कुलकर्णी.. बोला.. बोला.."

"डॉक्टर त्या वेळात मी काय पाहिले सांगू? मी पाहिली स्वर्ग नरकातली लाईन.. यमसदनातील जाहिराती.. आणि एमटीएनएल सारख्या घोषणा.. अजून अगदी नीट आठवतायत.."

"हूं..कदाचित नियर डेथ अनुभव असतील.. की स्वप्ने? की त्या अवस्थेतली तुमची इमॅजिनेशन! ते काही असो, पण आम्ही तुम्हाला जे केले ना त्याला सस्पेंडेड ॲनिमेशन म्हणतात..थोडक्यात बेडकासारखी निद्रितावस्था. थंडीत बेडूक निपचित पडून राहतो.. गोठल्यासारखा. त्याची ऊर्जेची गरज नगण्य..तसेच काहीसे हे" डॉक्टर भरूचा म्हणाले.

"पण घाबरू नका.. तुम्ही काय बेडकासारख्या उड्या मारत नाही फिरणार.." डॉक्टर फडके हसत बोलले.

एकूण हे असे झाले तर.


ते स्वर्ग नि नरक खरेच की काय? तिथली ती लाईन नि जाहिराती खरोखर की नुसता भास? भास नसतील.. आपल्याच मनातल्या कल्पना! पण खरेच हे असे असेल तर.. म्हणजे ते तिकडेही हे असेच  असते की काय? कोणास ठाऊक !


मी मात्र सध्या अधांतरी नाही..


अगदी अलाईव्ह नि किकींग.. म्हणजे जिवंत आहे हे खरे!


डॉ. नितीन मोरे यांची प्रकाशित पुस्तके

यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.























डॉ. नितीन मोरे
न.वा.च्या(प्रेम)कविता


डॉ. नितीन मोरे
वाळूतील
रेघा



राग दरबारी
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
अहम्
ब्रह्मास्मि



डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच



डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या



डॉ. नितीन मोरे
प्रिय पत्रास,



डॉ. नितीन मोरे
भ्र
शिष्टाचार



डॉ. नितीन मोरे
संधी साधू



डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात



डॉ. नितीन मोरे
मच्छर टाईम्स


डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो
ऐका


डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
अ..अ..म..
अवलोकन.अनुभव.मनोव्यापार


डॉ. नितीन मोरे
काही(च्या काही)कविता

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.

## डॉ. नितीन मोरे यांचे हे सव्विसावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी डॉक्टर आहेतच आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक ताजेपण असते. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, तर समाजातील अनिष्ट विसंगती ते आपल्या विनोदातून अलगद दाखवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळया प्रकारचे लेखन लिहीतात.  त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली डॉ. नितीन मोरे आपली अनेक पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंडित.

शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके),  डॉ. वसंत बागुल (१६ पुस्तके), शुभांगी पासेबंद (९ पुस्तके), अविनाश नगरकर (चार पुस्तके), नासा येवतीकर(८), डॉ. स्मिता दामले (९ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२५ पुस्तके), अनील वाकणकर

(७ पुस्तके), रत्नाकर महाजन (४ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (४), अशोक कोठारे (१० हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (महाराष्ट्राचे मुख्य अभियंता, ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक, ४ पुस्तके), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (८ पुस्तके), उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१३), डॉ. नंदिनी धारगळकर(८) संयम बागायतकर(२), मीना खोंड(३) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

www.esahity.com
esahity@gmail.com